दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३२८ । शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

### वंशावळ सिद्ध करा...

# एसईबीसी किंवा कुणबी एकच निवडा!’

## जरांगेंच्या मागण्यांवर जिल्हाधिकाऱ्यांचे नियमांचे स्पष्टीकरण; ‘आज-उद्या प्रमाणपत्र देणे शक्य नाही’

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा प्रशासनाने कुणबी प्रमाणपत्र वाटपाच्या प्रक्रियेबाबत महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. ‘वंशावळ सिद्ध करणे बंधनकारक असून, नियमाप्रमाणे एसईबीसी किंवा कुणबी यापैकी एकाच पर्यायाची निवड करावी लागेल. आज-उद्या प्रमाणपत्र देणे शक्य नाही; त्यासाठी निश्चित प्रक्रिया आहे,’ असे जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी स्पष्ट केले.



जालना जिल्ह्यात मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा अशा एकूण ५ हजार २७ नोंदी आढळल्या आहेत. कुणबी प्रमाणपत्रासाठी आतापर्यंत १८ हजार २०० हून अधिक अर्ज प्राप्त झाले असून, २ सप्टेंबरच्या शासन निर्णयानुसार ३७७ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. सर्व नोंदींच्या याद्या ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. दरम्यान, एसईबीसी प्रवर्गातून ३५ हजार ९८१ प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. जात पडताळणी समितीकडे आलेल्या १,६६४ अर्जांपैकी १,०१६ अर्जांची पडताळणी पूर्ण झाली आहे. कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक पुरावे सादर करून वंशावळ सिद्ध करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. दरम्यान, मनोज जरांगे यांच्या प्रकृतीवर वैद्यकीय पथक लक्ष ठेवून असून, उपचार सुरू आहेत. जातीय प्रश्नावरून सुरू असलेल्या संघर्षापेक्षा विकास आणि प्रगतीला प्राधान्य द्यावे, तसेच प्रत्येकाची पहिली ओळख ‘माणूस’ म्हणून असावी, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

### जरांगेंविरुद्ध थेट ‘ईडी’त तक्रार

मुंबई : मराठा आरक्षण अभ्यासक अजय बारसकर यांनी मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांविरुद्ध अंमलबजावणी संचालनालयाकडे (ईडी) तक्रार केल्याचा दावा केला आहे. मराठा आरक्षण आंदोलनाच्या नावाखाली भ्रष्टाचार करून अवैध संपत्ती जमवल्याचा आरोप बारसकर यांनी केला. वाळू व्यवसायातून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा दावा करत संबंधितांच्या संपत्तीची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. काही व्यक्तींच्या जमीन खरेदी, वाहनांवरील खर्च आणि वैद्यकीय उपचारांच्या पैशांच्या स्रोताचीही चौकशी करावी, अशी मागणी केल्याचे बारसकर यांनी सांगितले.

# मराठवाड्यात कुणबी प्रमाणपत्र वाटपाची विक्रमी झेप !

### ३ लाख १६ हजार ९७७ प्रमाणपत्रांचे वितरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** मराठवाड्यात कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वाटपाच्या प्रक्रियेला मोठी गती मिळाली आहे. शिंदे समितीच्या स्थापनेपासून ७ सप्टेंबर २०२६पर्यंत प्राप्त झालेल्या ३ लाख १७ हजार ५६९ अर्जांपैकी तब्बल ३ लाख १६ हजार ९७७ कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे प्राप्त अर्जांपैकी सुमारे ९९.८ टक्के अर्जांवरील कार्यवाही पूर्ण झाली असून, केवळ ४४ अर्ज प्रलंबित आहेत.

कुणबी प्रमाणपत्र वाटपात बीड जिल्हा सर्वाधिक आघाडीवर आहे. बीडमध्ये प्राप्त २ लाख १० हजार ९४१ अर्जांपैकी २ लाख १० हजार ९३१ प्रमाणपत्रे वितरित झाली आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये २६ हजार ५४ पैकी २५ हजार ९५८, जालना १८ हजार ७१६ पैकी १८ हजार ६५३, परभणी २० हजार २४५ पैकी २० हजार १९०, हिंगोली १३ हजार ७१३ पैकी १३ हजार ७०७, नांदेड ४ हजार ९१७ पैकी ४ हजार ८९३, लातूर २ हजार ९२४ पैकी २ हजार ८७०, तर धाराशिवमध्ये २० हजार ५९ पैकी १९ हजार ७७५ प्रमाणपत्रांचे वितरण झाले आहे. जालना, हिंगोली आणि बीड या तीन जिल्ह्यांत एकही अर्ज प्रलंबित नाही.

जात पडताळणीच्या प्रक्रियेलाही गती मिळाली असून, प्राप्त २१ हजार ५१ प्रकरणांपैकी १६ हजार ११० प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. यामध्ये बीडमधील १३ हजार ७७४ पैकी ११ हजार ४३७, छत्रपती संभाजीनगरमधील १ हजार ३५३ पैकी १ हजार १४२, जालन्यातील १ हजार ६६४ पैकी १ हजार १६, परभणीतील १ हजार २७१ पैकी ८२५, हिंगोलीतील ५६९ पैकी ३८५, नांदेडमधील ४६३ पैकी २७५,

१ सप्टेंबर २०२५ ते ७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मराठवाड्यात ७७ हजार ९५६ कुणबी प्रमाणपत्रे वितरित झाली. त्यात बीड जिल्ह्याचा वाटा ४७ हजार ८०८ इतका आहे. जुन्या महसुली, शैक्षणिक आणि इतर अभिलेखांमधील कुणबी नोंदी शोधणे, त्यांची पडताळणी करणे, वंशावळी जुळविणे आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याची प्रक्रिया प्रशासनाकडून राबविण्यात येत आहे.

लातूरमधील २७८ पैकी १५० आणि धाराशिवमधील १ हजार ६७९ पैकी ८८० प्रकरणांचा समावेश आहे.

दरम्यान, मराठा समाजाला देण्यात आलेल्या १० टक्के एसईबीसी आरक्षणाच्या अनुषंगाने २०२४ ते २०२६ या तीन वर्षांत मराठवाड्यात २ लाख ९५ हजार ३०५ प्रमाणपत्रांचे वाटप झाले आहे. २०२४ मध्ये ८० हजार ३८८, २०२५ मध्ये १ लाख ३४ हजार ४६०, तर २०२६ मध्ये ८० हजार ४५७ प्रमाणपत्रे देण्यात आली. तीन वर्षांच्या एकत्रित आकडेवारीत छत्रपती संभाजीनगर ४७ हजार ८२६, जालना ३५ हजार ९८१, परभणी ३९ हजार ५५८, हिंगोली ९ हजार ५९७, नांदेड ४० हजार ९०१, बीड ४२ हजार ४३, लातूर ४४ हजार ७५० आणि धाराशिव ३४ हजार ६४९ प्रमाणपत्रांचे वाटप झाले आहे.

नागरिकांना ही प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी जुन्या अभिलेखांमधील कुणबी नोंदी संगणकीकृत करून उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

तसेच १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिरांमध्ये नोंदी पाहणे, अर्ज करणे आणि प्रमाणपत्राबाबत आवश्यक मार्गदर्शन केले जाणार आहे. मोठ्या प्रमाणावर झालेली ही कार्यवाही अनेक कुटुंबांसाठी महत्त्वाची ठरत असून, प्रमाणपत्रामुळे शिक्षण, रोजगार आणि आरक्षणाशी संबंधित संधींचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

### महत्त्वाचे..

#### मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दोन दिवस दारू दुकाने बंद!

**जालना :** अंतरवली सराटी मधील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. आणखी दोन दिवस दारु बंदी वाढवली आहे. उद्या आणि परवा म्हणजेच ११ आणि १२ तारखेला दारुची सर्व दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत.गोंदी पोलीस स्टेशनच्या हद्दीत दोन दिवस मद्य विक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी दिले आहेत. त्यामुळं आता पुढचे दोन दिवस दारुमिळणार नसल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. गोंदी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सर्व घाऊक देशी आणि विदेशी दारू दुकाने बंद ठेवण्याचे आदेशदेण्यात आले आहेत. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार किंवा दंगल सदृश्य परिस्थिती होऊ नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून दोन दिवस म्हणजेच आज आणि उद्या अंतरवाली सराटीत असलेल्या गोंदी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये मध्ये मद्य विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या उपोषणादरम्यान वाढती गर्दी आणि संभाव्य कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी हा प्रतिबंधात्मक निर्णय घेतला आहे.

## टेम्पो-कार अपघात चौघांचा मृत्यू



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** नगर-कल्याण महामार्गावर भाळवणी गावच्या शिवारात हॉटेल संदीपसमोर गुरुवारी (दि. १०) पहाटे दोनच्या सुमारास आयशर टेम्पो आणि वॅगनर कारची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात घडला. ही धडक एवढी जबरदस्त होती की या अपघातात व्हॅगनार कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातात वॅगनरमधील एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला. शकील मोहम्मद शेख (वय ४५), सलमा शकील शेख (वय ४२), ईकबाल शकील शेख (वय २३) व सुमैय्या शकील शेख (वय १८, सर्व रा. गेट नं. ६, नुराणी मशीदसमोर, मालवणी, मुंबई) यांचा मृतांमध्ये समावेश आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, अल्ताफ शब्बीर शेख (रा. वाबळे कॉलनी, मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांनी पारनेर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शकील शेख हे कुटुंबासह अहिल्यानगर येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी वॅगनर कार (क्र. एमएच ४७ सीके १३०८) मधून येत होते. पहाटे दोनच्या सुमारास भाळवणी शिवारातील हॉटेल संदीपसमोर त्यांच्या कारला आयशर टेम्पो (क्र. एमएच १६ सीडी २७४७) ने समोरून जोराची धडक दिली. ही धडक एवढी जबरदस्त होती की धडके नंतर व्हॅगनार कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. (पान ४ वर)

## लंडनच्या संसदेत शिंदेंचा गौरव

#### महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या चर्चेला उधाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** ब्रिटनच्या संसद भवनातील हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ‘कॉमनवेल्थ पब्लिक लीडरशिप रिकग्निशन’ या प्रतिष्ठेच्या सन्मानाने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. ‘जय महाराष्ट्र’, ‘जय भवानी, जय शिवाजी’ आणि ‘भारत माता की जय’च्या घोषणांनी सोहळा दुमदुमला.




शिंदे यांनी पुरस्कार हा वैयक्तिक नसून महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेचा सन्मान असल्याचे सांगत आपल्या राजकीय भूमिकेला लोककेंद्री विकासाची जोड दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण (पान ४ वर)

# एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाची एसआयटी चौकशी

## २०२५ च्या मुख्य परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांची फेरतपासणी; तोपर्यंत मुलाखती स्थगित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध परीक्षांमध्ये गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या तक्रारी समोर आल्यानंतर राज्य सरकारने या प्रकरणांची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी ही घोषणा केली.

२०२५च्या गट-ब आणि गट-क मुख्य व पूर्व परीक्षांशी संबंधित तक्रारींची चौकशी एसआयटीमार्फत केली जाणार असून, प्राथमिकदृष्ट्या गैरप्रकार आढळलेल्या तक्रारींची स्वतंत्रपणे सखोल तपासणी केली जाणार आहे.

२०२५च्या मुख्य परीक्षांतील प्रश्नपत्रिकांची फेरतपासणी करण्याची मागणीही सरकारने मान्य केली आहे. ही फेरतपासणी पूर्ण होईपर्यंत संबंधित परीक्षांच्या मुलाखतींचा कार्यक्रम स्थगित ठेवण्याची सूचना एमपीएससीला करण्यात येणार आहे. तसेच उमेदवारांना माहितीच्या अधिकारातून उत्तरपत्रिका उपलब्ध करून देण्याबाबत आयोगाला आवश्यक सूचना दिल्या जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणाची चौकशी यापूर्वीच सुरू असून, हा तपास अंतिम टप्प्यापर्यंत नेण्यात येणार असल्याचेही सरकारकडून सांगण्यात आले. एमपीएससीच्या विविध परीक्षांतील गैरप्रकारांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र व्यवस्था उभारण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता, प्रश्नपत्रिकांची सुरक्षा आणि उमेदवारांचा आयोगावरील विश्वास कायम ठेवण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे एसआयटीच्या चौकशीत नेमके कोणते गैरप्रकार समोर येतात आणि प्रश्नपत्रिकांच्या फेरतपासणीत काय निष्पन्न होते, याकडे राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

### हा सत्तेचा माज आहे का? नागरिकांचा सवाल

**भर बाजारपेठेत लोकप्रतिनिधींच्या जवळच्या व्यक्तींकडून सामान्य नागरिकाला होणाऱ्या या मारहाणीमुळे हा सत्तेचा माज आहे का? असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.या संपूर्ण प्रकरणाची राजूर पोलिसांनी गंभीर दखल घ्यावी आणि दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, अधिकृत पोलीस अहवाल आणि आमदारांच्या गटाची बाजू समोर आल्यानंतरच सत्य परिस्थिती अधिक स्पष्ट होईल.**




# कागदपत्रे मागितली म्हणून ‘जातीय’ ठराव!

## दैठणे गुंजाळ सेवा संस्थेत कथित अपहाराच्या चौकशीला धक्कादायक वळण

### माजी सचिव रोकडे यांच्यावरच फौजदारी कारवाईचे आदेश

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा/पारनेर :** पारनेर तालुक्यातील दैठणे गुंजाळ विकास सेवा संस्थेतील कथित अपहार व अफरातफरीच्या प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले आहे. कथित गैरव्यवहाराच्या मुद्यांवर चाचणी लेखापरीक्षण सुरू असताना माजी सचिव सुरेश रोकडे यांनी स्वतःचा खुलासा करण्यासाठी संस्थेकडे कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सशुल्क मागितल्या. मात्र, ही कागदपत्रे देऊ नयेत म्हणून संस्थेच्या संचालक मंडळाने जातिवाचक ठराव केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित कागदपत्रांची पूर्तता न झाल्याने माजी सचिवांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली नसतानाच त्यांच्यावर अपहार व अफरातफर केल्याचा ठपका ठेवण्यात आल्याचा आरोप आहे. लेखापरीक्षक मुकेश वडियार यांनी माजी सचिवांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याची शिफारस



करणारा विशेष व विनिर्दिष्ट अहवाल सहाय्यक निबंधक, पारनेर यांच्याकडे सादर केल्याचे सांगण्यात येत आहे.

**कागदपत्रे द्या, मग खुलासा करू; पण...**

सहाय्यक निबंधक, पारनेर यांनी कथित अपहार व अफरातफरीच्या काही मुद्यांचे चाचणी लेखापरीक्षण करण्याचे आदेश लेखापरीक्षक मुकेश वडियार यांना दिले होते. त्यानुसार लेखापरीक्षण सुरू असताना माजी सचिव रोकडे यांनी संबंधित मुद्द्यांबाबत खुलासा करण्यासाठी संस्थेच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सशुल्क मागितल्या.मात्र, मागितलेली कागदपत्रे देण्याऐवजी जातिवाचक स्वरूपाचा ठराव करून माहिती रोखण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे ‘ज्या कागदपत्रांच्या आधारे आरोप केले जात आहेत, तीच कागदपत्रे संबंधित व्यक्तीला खुलासा करण्यासाठी का देण्यात आली नाहीत?’ असा सवाल उपस्थित झाला आहे.

**‘नैसर्गिक न्याय’ कुठे गेला?**

माजी सचिव रोकडे यांनी याप्रकरणी सहाय्यक निबंधक, पारनेर यांच्याकडे दाद मागितली. त्यानुसार सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान संस्थेने (पान ४ वर)

## विद्यार्थिनीचा विनयभंग करिअर अकॅडमी चालकावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणीचा अकॅडमी चालकाने विनयभंग केल्याची संतापजनक घटना अहिल्यानगर मध्ये घडली आहे. शिवरक्षक करिअर अकॅडमीचा चालक योद्धा राजे पवार यांच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अकॅडमी चालकाने विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याच्या घटनेमुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली असून विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, बीड जिल्ह्यातील एका गावात रहिवासी असलेली २१ वर्षीय विद्यार्थिनी अहिल्यानगरमधील शिवरक्षक करिअर अकॅडमीमध्ये पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेत होती. ही विद्यार्थिनी याच संस्थेच्या वस्तीगृहात वास्तव्यास होती. दरम्यान दि. १७ जुलै ते दि. ३ सप्टेंबर या कालावधीमध्ये संशयित आरोपी योद्धा राजे पवार यांनी या विद्यार्थिनीला कार्यालयात बोलावून तिच्याशी गैरवर्तन केले. हा प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही आरोपीने दिली.

याशिवाय ही तरुणी अनुसूचित जमाती प्रवर्गातील असल्याचे माहित असतानाही तिला जातीय वाचक हीन बोलून अपमानित केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेनंतर घाबरलेल्या विद्यार्थिनीने घडलेला प्रकार आपल्या गावी गेल्यानंतर पालकांना सांगितला. याबाबत बीड जिल्ह्यात गुन्हा दाखल करून झिरो नंबर ने सदरचा गुन्हा तोफखाना पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. या गुन्ह्याचा अधिक तपास तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

# बैलपोळ्यावर दुष्काळाचे सावट...

## बैल घटले आणि उत्साहही मावळला

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शेतकऱ्यांच्या जीवनात असलेला बळीराजाचा महत्त्वाचा सण म्हणजे बैलपोळा. शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस साजरा केला जातो. मात्र, यंदा सर्वत्र पावसाने पाठ फिरविल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटाला तोंड देत आहे. आणि त्याचाच परिणाम यंदाच्या बैलपोळ्याच्या उत्साहावरही झाला आहे. राहुरीच्या बाजारपेठेत यंदा खरेदीचा उत्साह कमी दिसून आला असून दुष्काळाचा सावटाखाली बळीराजाचा बैलपोळा साजरा होत आहे.



पूर्वी पोळा म्हटलं की गावागावात मोठ्या प्रमाणावर उत्साह असायचा. बैलांना तेल लावून, शिंगांना रंग देऊन त्यांची सजावट केली जायची. पूजा करून बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली जात होती. मात्र, आता आधुनिक युगात शेतीचा यंत्र सामग्री मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने शेतीत ट्रॅक्टर आणि यंत्रांचा वापर वाढल्याने बैलांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होत आहे. यंदा पावसाअभावी खरीप पिकं धोक्यात आहेत. शेतकऱ्यांच्या डोक्यावर दुष्काळाचे सावट आहे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा कमी आहे. याचा परिणाम पोळ्याच्या बाजारपेठेवरही झाला आहे. बाजारपेठेत बैलांच्या सजावटीचं साहित्य दाखल झालं आहे. मात्र, ग्राहक आणि खरेदीचा उत्साह कमी असल्याचं विक्रेत्यांचं म्हणणं आहे.

यामध्ये व्यापार करणारे मुकेश जगधने, सचिन शिंदे, घुंगरू विक्रेता सक्षम भारस्कर या छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांनी यंदाच्या बैलपोळ्याच्या सणाच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

दुष्काळ आणि वाढतं यांत्रिकीकरण यामुळे बैलपोळ्याचं स्वरूप दिवसेंदिवस बदलत चाललेआहे.बैलपोळा हा केवळ बैलांची पूजा करण्याचा सण नाही, तर शेतकरी आणि बैलांचं नातं जपणारी परंपरा आहे. मात्र, बैलांची घटती संख्या आणि दुष्काळामुळे या परंपरेसमोर आव्हान उभे ठाकले आहे.

# द•ख•ल

## गळनिंब येथे 'एसआयआर २०२६ मतदार' यादी प्रसिद्ध



**उक्कलगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील गळनिंब येथे भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार एसआयआर २०२६ अंतर्गत मतदार यादी भाग (क्र. २०८ ) जाहीर करण्यात आली. मा.सरपंच शिवाजी चिंधे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ नेते अण्णासाहेब शिंदे व बीएलओ सुभाष भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही यादी प्रसिद्ध करण्यात आली. याप्रसंगी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. यावेळी माजी प्राचार्य एकनाथ ढोणे, प्रा. बाळासाहेब वडितके, संजय कुदनर, सिद्धेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष आदिनाथ वडितके, सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष सुनील शिंदे, सोहम चिंधे, गोविंद कुलकर्णी, मा. प्राचार्य देवराम वडितके, माजी पर्यवेक्षक सुधाकर पिलगर, माजी मुख्याध्यापक सूर्यभान वडितके, माजी चेअरमन जयप्रकाश वडितके आणि चंद्रकांत भोसले यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात



**सोनई :** श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तुवर होते. यावेळी सर्व शिक्षकांचा विद्यार्थ्यांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्यांनी गुरु हा केवळ शिकवणारा नसून घडवणारा असतो, आजचा विद्यार्थी हाच उद्याचा देशाचा आधार आहे असे मार्गदर्शन केले. अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत आपले मनोगत मांडले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरिश्चंद्र माने, पर्यवेक्षक प्रा. गोवर्धन रोडे, यश संवाद प्रमुख प्रा देविदास साळुंके सर, ज्येष्ठ प्रा. भगवंतविरकर, प्रा राम काळे, प्रा. भोगे आदी शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनी आपले मनोगत व्यक्त केले, याप्रसंगी सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा राऊत, श्रद्धा मारकळी हिने केले तर आभार शिवकन्या शेटे हिने मानले.

## संत सेना महाराजांची पुण्यतिथी साजरी



**सोनई :** येथील श्री संत शिरोमणी श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने सोनई नाभिक समाजाच्या वतीने संत सेना महाराजांच्या प्रतिमेचे सुवाद्य मिरवणूक काढून पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रतिमेचे पूजन करून गावातून मिरवणूक काढली. मिरवणूक, स्वामी विवेकानंद चौक संभाजी चौक, नदीपात्रातून बस स्थानक, महादेव मंदिर, दरंदले गल्ली या मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली.

या कार्यक्रमानिमित्त महिला, समाजबंधवसह अध्यक्ष नंदकिशोर औटी, तात्यासाहेब कोरडे, अमोल कोरडे, बंडू बिडे, सचिन वाघमारे, श्रीराम दळवी, पांडुरंग तोडकर, अतुल राऊत, प्रवीण कदम सह सर्व पदाधिकारी नागरिक यांनी अभिवादन केले.

# अण्णा हजारेंची अधिकाऱ्यांनी घेतली भेट प्रकृतीची आस्थेने विचारपूस



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे प्रकृती अस्वास्थ्यामुळे मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल आहेत. त्यांची बृहन्मुंबई मुंबईचे अपर जिल्हाधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सचिव दत्तात्रय नवले, राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाचे अपर जिल्हाधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक प्रकाश थविल आणि अतिक्रमण निष्कासन पश्चिम उपनगरे, वांद्रे, मुंबई उपनगरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी गणेश मिसाळ यांनी भेट घेऊन प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. या भेटीदरम्यान अण्णा हजारे यांच्याशी विविध विषयांवर मनमोकळ्या गप्पा झाल्या. चर्चे दरम्यान जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. दत्तात्रय नवले आणि गणेश मिसाळ हे अहिल्यानगर जिल्ह्यातील असल्याने अण्णांनी त्यांच्याकडून जिल्ह्यातील तसेच गाव परिसरातील विविध घडामोडींची माहिती घेतली. आपल्या भागातील अधिकारी भेटण्यासाठी आल्याने अण्णा हजारे यांनी समाधान व्यक्त केले. या भेटीत जुन्या आठवणींना उजाळा देत अण्णांनी विविध विषयांवर मिश्कील शैलीत गप्पा मारल्या.

# अवैध गुटखा प्रकरणी अटक आरोपीचे घर पाडण्याची नोटीस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** मागील आठवड्यात गुन्हा अन्वेषण विभागाने गुटखा व सुगंधीत तंबाखु चा व्यापार करणाऱ्या आरोपींच्या घरावर धाड टाकून मोठ्या प्रमाणात साठा जप्त करून त्यांच्यावर अटकेची कारवाई केली तसेच माजी मंत्री आमदार प्राजक्त तनपुरे यांनी ही आठ दिवसात गुटखा तस्करीचे समूळ नायनाट करण्याचे सांगितले असून तसे न केल्यास आंदोलनाचा इशारा दिल्याच्या पार्श्वभूमीवर राहुरी खुर्द ग्रामपंचायतीने आरोपीला नोटीस बजावली असून नोटीस मध्ये आरोपी सध्या स्थितीत राहत असलेल्या मिळकत क्र . ४४ /३ ह्यामध्ये असणाऱ्या आर . सी . सी . बांधकामाची रहिवास म्हणून नोंद असताना त्या ठिकाणी गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ व इतर मालाची साठवणूक व त्याची अवैधरित्या विक्री करत असल्याची खबर मिळताच गुन्हा अन्वेषण विभागाने धाड टाकून गुटखा व तंबाखूजन्य इतर वस्तुंचा साठा जप्त करून पवन दगडुसिंग गिरासे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. वरील मिळकत ही निवासी प्रयोजनासाठी घराचा वापर करणे नियमा मध्ये असताना आपण शासन बंदी असलेले गुट्खा व सुगंधीतंबाखू व इतर गैरमार्गाने अवैध व्यवसायासाठी वापर करीत असल्याचे सिद्ध झाले आहे तेव्हा आपण रहिवासी क्षेत्र नियमाचे उत्लंघन केल्यामुळे आपले बांधकाम हे अनधिकृत असून ते पाडण्याची कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबत १५ दिवसात खुलासा करावा व तसे लेखी म्हणने ग्रामपंचायतीस सादर करावे असे नोटीसीत म्हटले आहे. ग्रामपंचायतीने सदर नोटीस बजावल्याने अवैध धंदे करण्याचे धाबे दणाणले असून अवैध दारु, मटका, गांजा, वाळू या सर्वांवर अशीच कारवाई करावी अशी मागणी नागरीकांकडून होत आहे.

# भेंडा बुद्रुक येथे दशक्रियाविधीचे औचित्य साधून वृक्षांचे वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथील फुलारी परिवाराचे आधारवड बबनराव नामदेव फुलारी (अण्णा) यांच्या दशक्रियाचे विधीचे औचित्य साधून फुलारी परिवाराने भेंडा बाजारतळ परिसरात वृक्षरोपण करून उपस्थित नातेवाईकांना ७१ वृक्षांचे वाटप केले.

नेवासा तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथील माजी उपसरपंच शिवाजी फुलारी यांचे बंधू आप्पासाहेब फुलारी, संतोष फुलारी व सौ.संध्या पुंड यांचे वडील,इंजिनियर नयन व राजन फुलारी यांचे चुलते बबनराव नामदेव फुलारी यांचे दि.१ सप्टेंबर रोजी वयाचे ७१ व्या वर्षी आजारपणाने निधन झाले. त्यांच्या दशक्रिया विधी निमित्त फुलारी परिवाराने गुरुवार दि.१० सप्टेंबर रोजी कै. बबनराव यांच्या वया इतके म्हणजे ७१ झाडे लावण्याचा संकल्प केला आणि दशक्रिया विधीच्या दिवशी भेंडा बाजारतळ परिसरात वृक्षारोपण करून व उपस्थित नातेवाईकांना झाडांची रोपे वाटून तो संकल्प पूर्ण ही केला. प्रत्येक माणूस जन्माला आला की स्वतःचा प्रपंच,कुटुंब या जबाबदाऱ्या तर निभावतोच,परंतु आपले समाजाप्रती, गावा प्रती आणि निसर्गा प्रती ही आपले काही तरी देणे लागते याची जाणीव प्रत्येक माणसाला असायला हवी. माणूस जन्मल्या पासून मरेपर्यंत निर्सगावर अवलंबून असतो.

जगण्यासाठी ऑक्सिजन आणि मृत्यू नंतर ही अंत्यसंस्कारासाठी लागणारे जवळ जवळ एका झाडाचे सरपण निर्सगच आपल्याला देत असतो. झाडे संपली तर माणसं ही संपतील ही बाब सूर्य प्रकाशा इतकी स्वच्छ आहे.त्यामुळे झाड लावणं ही आपली जबाबदारी आणि राष्ट्रीय कर्तव्यच आहे जाणून फुलारी परीवाराने ७१ वृक्ष लागवडीचा संकल्प पूर्ण करून उद्या प्रत्येकाचे दारात मोठी होणाऱ्या झाडामध्ये सर्वजण आपले अण्णाच बघणार आहोत अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### झाडे माणसाला काय देतात

झाडे माणसाला जगण्यासाठी आवश्यक असणारा प्राणवायू (ऑक्सिजन), अन्न, फळे, फुले आणि सावली देतात. घरे, फर्निचर, शेतीची अवजारे आणि कागद बनवण्यासाठी लागणारे लाकूड झाडे पुरवतात. कडक उन्हाळ्यात थंडावा आणि सावली मिळते, तसेच पक्षी व प्राण्यांना राहण्यासाठी आसरा मिळतो. झाडे मान्सून आणि पावसाचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. झाडांची मुळे माती घट्ट धरून ठेवतात, ज्यामुळे मातीची धूप आणि पूर थांबण्यास मदत होते.त्यामुळे प्रत्येक माणसाने एक तरी झाड लावून त्याचे संगोपन व संवर्धन करावे.

**- सुखदेव फुलारी, पर्यावरण मित्र**

# प्रवरेचा विश्वास गुणवत्तेमुळेच कायम : राधाकृष्ण विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्थापन झालेल्या प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा नावलौकिक गुणवत्तेमुळे कायम आहे. संस्थेतून दीड लाखांहून अधिक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असून, मातीशी एकरूप झालेल्या माणसांच्या समर्पित भावनेमुळेच 'प्रवरे'चा विश्वास आणि वेगळेपण निर्माण झाले आहे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व पालकांच्या स्नेहसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, संचालक शांतीनाथ आहेर, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाणे, प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठी यांच्यासह विद्यार्थी, पालक व प्राध्यापक उपस्थित होते. प्रवेश परीक्षेत गुणवत्तेने यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विखे पाटील म्हणाले, प्रवरा संस्थेने गुणवत्तेशी कधीही तडजोड केली नाही. अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध प्रयोगांतून संस्थेने राज्याला दिशा दिली असून, शेतकऱ्यांच्या मुलांनी मिळवून दिलेली गुणवत्ता हा संस्थेचा अभिमान आहे. देश-विदेशातील नामांकित कंपन्यांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी संस्थेचा नावलौकिक वाढविला आहे.

संरक्षण उत्पादन क्षेत्रात योगदान देणारे माजी विद्यार्थी गणेश निबे यांनी 'निबे स्पेस'च्या माध्यमातून खासगी अंतराळ क्षेत्रात सुरू केलेली वाटचाल प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेत सध्या ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून, परिसरात निर्माण झालेल्या शैक्षणिक वातावरणामुळे साक्षरतेचे प्रमाणही वाढले आहे. येथे प्रवेश घेणारा प्रत्येक विद्यार्थी हा प्रवरा परिवाराचा घटक बनतो, असे विखे पाटील म्हणाले. आपणही प्रवरा संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याचे सांगत, १९६४ मध्ये पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी स्थापन केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आपले शिक्षण झाल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनीही याच संस्थेत बारावीपर्यंत शिक्षण घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

# विचारधारेच्या पलीकडे जाऊन कलेची साधना!

## राजश्री ससाणेंच्या पेन्सिलमधून साकारले बाळासाहेब ठाकरेंचे चित्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** राजकीय मतभेद, पक्षांच्या सीमा आणि विचारधारेच्या चौकटी यापलीकडे जाऊन कलेची साधना करता येते, हे माजी नगराध्यक्षा राजश्री ससाणे यांनी दाखवून दिले आहे. आयुष्यभर काँग्रेसच्या विचारधारेशी एकनिष्ठ राहिलेल्या ससाणे यांनी वयाच्या साठीनंतर चित्रकलेचे शास्त्रोक्त धडे घेत, शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे अप्रतिम पेन्सिल चित्र साकारले आहे. एका काँग्रेसनिष्ठ नेत्या महिलेच्या हातातील पेन्सिलमधून बाळासाहेबांचे प्रभावी रेखाचित्र साकारल्याने श्रीरामपुरात त्यांच्या कलागुणांचे कौतुक होत आहे.



माजी आ. स्व. जयंत ससाणे यांच्या पत्नी आणि श्रीरामपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या मातोश्री असलेल्या राजश्री ससाणे यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रियपणे काम केले. मात्र, त्यांच्यातील कलाकाराला राजकारणाची चौकट कधीही अडसर ठरली नाही. राजकीय क्षेत्रात सक्रिय असतानाही त्यांनी सुमारे ५०० गणपतींची चित्रे साकारली होती. राजकीय व्यस्तता कमी झाल्यानंतर नात शौर्या हिच्यासोबत वेळ घालवताना त्यांच्यातील चित्रकार पुन्हा जागा झाला. आजीच्या कलाप्रेमामुळे शौर्या हिलाही चित्रकलेची गोडी लागली असून ती सुंदर चित्रे साकारत आहे.

चित्रकलेचे शास्त्रोक्त शिक्षण सुरू केल्यानंतर राजश्री ससाणे यांनी पहिलेच रेखाचित्र छत्रपती शिवाजी महाराजांचे साकारले. या चित्रातील छत्रपतींच्या डोळ्यांतील ओजस्वी भाव आणि रेखाटनातील बारकावे पाहता हे त्यांचे पहिले चित्र आहे, यावर सहज विश्वास बसत नाही. त्यानंतर त्यांनी साकारलेले बाळासाहेब ठाकरे यांचे चित्रही विशेष लक्षवेधी ठरले आहे. अवघ्या महिनाभराच्या सरावात त्यांनी पेन्सिल रेखाटनावर मिळवलेली पकड आणि रेषांमधील सहजता कौतुकास्पद आहे. याशिवाय शिवशंकर, अवतार मेहेरबाबा, श्रीगणेश आणि श्रीकृष्ण यांचीही त्यांनी अनेक वेधक चित्रे साकारली आहेत.

चित्रकार रवी भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकलेचे धडे घेताना राजश्री ससाणे यांनी वय, पद अथवा प्रतिष्ठेचा कोणताही अहंकार न बाळगता विद्यार्थी म्हणून शिकण्याची भूमिका स्वीकारली. सार्वजनिक जीवनातील प्रदीर्घ अनुभव आणि व्यस्तता बाजूला ठेवून त्यांनी मनातील सुप्त कलेला पूर्णत्व देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कला शिकण्यासाठी वयाची मर्यादा नसते, हे त्यांनी आपल्या कलाप्रवासातून सिद्ध केले आहे.

# विद्यार्थ्यांनी नोकरी देणारे उद्योजक व्हावे : शालिनीताई विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता नोकरी निर्माण करणारे उद्योजक बनण्याचे ध्येय ठेवावे. प्रवरा संस्थेतून मिळणाऱ्या दर्जेदार व कौशल्याधारित शिक्षणाचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसोबत समाजाच्या विकासासाठी करावा. मोठी स्वप्ने पाहून जीवनात यशस्वी व्हावे आणि आई-वडिलांसह संस्थेचे नाव उज्वल करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

'पायरेन्स' संस्थेतील एमबीए, एमसीए आणि बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व पालकांच्या स्नेहमेळाव्यात त्या बोलत होत्या.



यावेळी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, सचिव डॉ. निलेश बनकर, आयबीएमचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी, एमसीए समन्वयिका प्रा. ऋतुजा कोतकर, प्रा. सौरभ विखे यांच्यासह विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते. शालिनीताई विखे पाटील म्हणाल्या, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून पुढे जाता यावे, या उद्देशाने शैक्षणिक संस्थांची उभारणी केली.

प्रवरेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कर्तृत्व गाजवत आहेत. विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार ठेवून आवडीच्या क्षेत्रात करिअर करावे आणि मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करावा. डॉ. सुप्रिया ढोकणे यांनी पदवीसोबत जीवनोपयोगी कौशल्ये देण्यावर संस्थेचा भर असल्याचे सांगितले. पालकांनी शिक्षकांच्या संपर्कात राहून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी डॉ. मोहसीन तांबोळी यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. पालकांच्या वतीने एस. बी. डुक्रे व कविता तोडमल यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रतीक्षा पुलाटे, सृष्टी चौधरी व पायल राहणे यांनी केले. आभार प्रा. ऋतुजा कोतकर यांनी मानले.

**Janseva Foudation, Loni Budruk**
Old Pirence Office, Loni Burduk, Tal-rahata,
Dist-Ahilyanagar (MS) 413736
Mobile No.9762526272, 9403651565, 7020815835
Mail-principal.acshendi@pravara.in

**REQUIRE**

Applications are invited for the post of Assistant Professor (UG ) at "Janseva Foundation Loni Budruk Arts Commerce College, Shendi (Bhandardara) Tal-Akole, Dist- Ahilyanagar. 422604, NAAC Acrridated B+ College for the academic year 2026-2027 on permanent non-grant Adhoc Basis.

| Sr. No | Name of the Subject | No. Of Post | Vacant Posts |
|---|---|---|---|
| 1 | English | 01 | Open To All |
| 2 | Marathi | 02 | Open 01, SC 01 |
| 3 | Hindi | 01 | Open To All |
| 4 | Economics | 01 | Open To All |
| 5 | Politics | 01 | Open To All |
| 6 | Geography | 01 | Open To All |
| 7 | Chemistry | 01 | Open To All |
| 8 | Botany | 01 | Open To All |
| 9 | Zoology | 01 | Open To All |
| 10 | Commerce | 03 | SC 01, DT-A 01, Open 01 |

Qualification & Pay Scale : 1) Post Graduate degree in relevant subject with NET/SET/Ph.D
2) As per norms of Savitribai Phule Pune University, Pune, Govt. of Maharashtra & UGC Rules.

Application on plain paper giving full bio-data along with attested Xerox copies of certificates and testimonials, two passport size photographs and physical fitness certificate should reach to the Secretary on above address & Email ID-principal.acshendi@pravara.in within 05 days from the date of publication of this advertisement.

**SECRETARY**

ने.ता. १७/९/२०२६ **घोषणापत्र** ॲड. रेणुकर एस.ए., कर्जत
नि. नं. ६

**कर्जत येथील मे. सिव्हील जज्ज साहेब, सि.डि. यांचे कोर्टात..**

सि.चौ.अ.नं. ४२/२०२६

**अर्जदार**
१. रवि बाबा शेलार, २. स्वराली रवि शेलार, ३. अभय रवि शेलार, सर्व रा. राशीन, ता. कर्जत जि.अ.नगर

**सा.वाले –** कोणी नाही.

**अर्जः– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ वारस प्रमाणपत्र मिळणेबाबतः–**

१. अर्जदार नं. १ ची पत्नी व अर्जदार नं. २ व ३ ची आई नामे प्रियंका रवि शेलार हिचे माहेरकडील नाव प्रियंका बाळासो जगताप असे असुन सासरकडील नाव प्रियंका रवि शेलार असे आहे. सदर मयत प्रियंका बाळासो जगताप या माहेरकडील नावाने बँकेमध्ये खाते आहे. अर्जदार नं. १ची पत्नी व २ व ३ यांची आई प्रियंका रवि शेलार हि दिनांक ८/५/२०२५ रोजी राशीन येथे मयत झालेली आहे. तिच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत राशीन येथे झालेली असुन मयत प्रियंका रवि शेलार हिचे मृत्युचे प्रमाणपत्र या अर्जासोबत जोडले आहे. मयत प्रियंका रवि शेलार हिचे अर्जदार नं. १ ते ३ हे कायदेशीर वारस असुन मयत प्रियंका रवि शेलार यांचे नावे मयत प्रियंका रवि शेलार हि हि मौजे राशीन, ता. कर्जत जि. अहिल्यानगर येथे कुटुंबासमवेत रहात होती.
३. मयत प्रियंका रवि शेलार हिचे कायदेशीर वारस अर्जदार नं. १ यांनी दिनांक २०/३/२०२६ रोजी फिनॅकल इन्सुरन्स कंपनी यांचेकडे अटल पेन्शन योजनेची रक्कम मिळणेसाठी अर्जदार नं. १ हे युनियन बँक ऑफ इंडीया शाखा राशीन या बॅकेत मध्ये गेले असता सदर युनियन बँकेतील अधिकारी हे अर्जदार नं.१ यांना म्हणाले की, तुम्ही मयत प्रियंका रवि शेलार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे मे. कोर्टाचे वारसप्रमाण घेवुन या त्यानंतरच तुम्हाला अटल पेन्शन योजनेची रक्कम मिळेल असे सांगितलेमुळे अर्जदार नं. १ यांना मे. कोर्टाचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्या करिता सदरचा अर्ज अर्जदार नं. १ ते ३ या वारसांनी सदरचे वारसप्रमाण पत्र मिळणेसाठी मे. कोर्टात दाखल अर्ज करीत आहेत. अर्जदार हे मुळचे राशीन, ता. कर्जत येथील कायमचे रहीवाशी असल्याने सदरचा अर्ज चालविणेचा व योग्य ती कायदेशीर चौकशी करण्याची मे. कोर्टाला अधिकार आहे. तसेच अर्जदार यांनी अर्जासोबत लग्नाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.
४. यापुर्वी या न्यायालयाकडून अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र घेतले नाही किंवा इतर न्यायालयात वारसप्रमाणत्र मिळणेकरिता दुसरा अर्ज केला नाही. त्यामुळे अर्जदार नं. यांना मयत प्रियंका रवि शेलार यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.
५. अर्जदार यांनी या अर्जाशिवाय इतर कोणत्याही मे. कोर्टात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला नव्हता व नाही. त्याअर्थी मयत प्रियंका रवि शेलार हिचे अर्जदार हि कायदेशीर वारस नाहीत अथवा अर्जदार अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळणेचा अधिकार नाही असे कोणाचे म्हणणे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत समक्ष हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणी या लेखावरून असेही कळविणेत येते की, जर सदरहु मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास न्यायालय अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत केल्यास अर्जदार हिस वारस प्रमाणपत्र देईल तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत चालणार नाही. आज दिनांक ०४/९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली असे.

नेमलेली तारीख : १७/०९/२०२६

सही/–
वरीष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर कर्जत,

शिक्का

हुकुमावरून
सही/–
(अधिक्षक)
दिवाणी न्यायालय व. स्तर कर्जत, जि. अहमदनगर

## पान १ वरुन

### टेम्पो-कार अपघात चौघांचा मृत्यू

कारमधील शकील शेख, सलमा शेख, ईकबाल शेख आणि सुमैय्या शेख हे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध अवस्थेत पडले होते. घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी तत्काळ रुग्णवाहिकेला माहिती देऊन जखमींना पारनेर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर चौघांनाही सकाळी १० वाजून ५६ मिनिटांनी मृत घोषित केले. अपघातानंतर आयशर चालक घटनास्थळावरून फरार झाला. असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अज्ञात आयशर चालकाविरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पारनेर पोलिसांकडून अपघाताचा पुढील तपास करण्यात येत आहे.

### लंडनच्या संसदेत शिंदेंचा गौरव

योजना, शासन आपल्या दारी, दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग आणि वैद्यकीय सहाय्यता यांचा उल्लेख करत त्यांनी आपल्या सरकारच्या कामगिरीचा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आढावा मांडला. विशेष म्हणजे, ब्रिटिश संसदेत सुरेश भटांच्या 'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी' या ओळी उद्धृत करून शिंदेंनी मराठी अस्मितेचाही मुद्दा अधोरेखित केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना भारत जागतिक नेतृत्वाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे त्यांनी म्हटले. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर करण्याचे लक्ष्यही त्यांनी मांडले. त्यामुळे लंडनच्या मंचावरून शिंदेंनी विकास, मराठी अस्मिता आणि मोदी नेतृत्वाचा संदेश देत आगामी राजकारणाची दिशा स्पष्ट केली का? यावर राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

### कागदपत्रे मागितली म्हणून 'जातीय' ठराव!

कागदपत्रे नाकारताना केलेल्या कथित जातिवाचक ठरावाची बाब सहाय्यक निबंधकांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्याचे सांगण्यात येते.मात्र, कागदपत्रे उपलब्ध करून देऊन संबंधित माजी सचिवांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्याऐवजी सचिवाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याच्या दिशेने आदेश देण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेत नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन झाले का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. सहाय्यक निबंधकांची भूमिकाही प्रश्नांच्या भोवऱ्यात- सहाय्यक निबंधक विशाल दाते यांच्या भूमिकेबाबतही आता प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. जातिवाचक ठरावाची बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर संस्थेला कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले का, माजी सचिवांना पुरेसा खुलासा करण्याची संधी मिळाली का आणि त्यानंतरही त्यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाईचे आदेश कोणत्या कायदेशीर आधारावर देण्यात आले, याची चौकशी होण्याची मागणी होत आहे.जातीय भेदभावाच्या आरोपाची स्वतंत्र चौकशी होण्याआधीच संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतलेल्या निर्णयामुळे प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आल्याचा आरोप माजी सचिवांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे.'अॅट्रॉसिटी'ची तरतूद लागू होते का? जातीय कारणावरून एखाद्या व्यक्तीला कायदेशीर हक्काच्या कागदपत्रांपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न झाला असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधितांवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदी लागू होतात का, हा आता महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा ठरणार आहे.विशेष म्हणजे, जातिवाचक ठराव कोणी केला, त्यामागील उद्देश काय होता, कागदपत्रे का रोखण्यात आली आणि त्यानंतर प्रशासकीय यंत्रणेने कोणती भूमिका घेतली, याची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. चौकशी निष्पक्ष हवी; दोन्ही बाजू ऐकणे गरजेचे - कथित अपहार व अफरातफरीच्या आरोपांची चौकशी झालीच पाहिजे; मात्र आरोप असलेल्या व्यक्तीला संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देऊन त्याचा खुलासा ऐकणे आणि त्यानंतरच निष्कर्षापर्यंत पोहोचणे ही न्याय्य प्रक्रिया असल्याचा दावा करण्यात येत आहे.

# पिपाडा परिवाराच्या वतीने बैल पोळा सण उत्साहात साजरा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : शेतकऱ्याच्या आयुष्यात बैल म्हणजे केवळ पशुधन नाही, तर सुख-दुःखाचा सोबती आणि शेतीच्या प्रत्येक घामाच्या थेंबाचा साक्षीदार आहे. अशी भावना भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी बैलांप्रती व्यक्त केली. अतिशय कृतज्ञतेच्या भावनेतून प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा ममता पिपाडा व भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी पिपाडा परिवारासह बैलपोळा सण उत्साहात साजरा केला.

यावेळी प्रगतशील शेतकरी शिवाजी आनप,आरपीआय नेते दिलीप वाघमारे, मदनलाल पिपाडा, नरेंद्र पिपाडा, लिलाबाई पिपाडा, सागर आनप, महावीर पिपाडा, माया पिपाडा, निखील पिपाडा, सुखदेव गोलांडे, श्रृती पिपाडा, सुरेश गरुड, साहिल पिपाडा यांच्यासह बालगोपाल आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी प्रगतशील शेतकरी शिवाजी आनप यांच्या बैलजोडीचे ममता पिपाडा व पिपाडा कुटुंबातील महिलांनी विधिवत पूजन करून औक्षण करण्यात आले. बैलांना आकर्षक सजावट करून त्यांना पुरणपोळीचा गोड नैवेद्य देत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. अस्सल शेतकरी असलेले शिवाजी आनप यांनी बैलांची अतिशय देखणी व रुबाबदार सजावट केली होती.

श्री विरभद्र देवस्थानापासुन वाजत-गाजत बैलांची मिरवणुक काढली जाते. आजच्या धावपळीच्या आणि आधुनिक जीवनशैलीत अनेक पारंपरिक सणांचे स्वरूप बदलत असले, तरी आपली माती, शेती, शेतकरी आणि आपल्या संस्कृतीशी जोडलेली नाती जपणे हीच खरी समृद्धी आहे. बैलपोळा हा केवळ सण नसून शेतकऱ्याच्या कष्टाला सलाम आणि मुक्या जीवांप्रती कृतज्ञतेची भावना व्यक्त करणारा संस्कृतीचा उत्सव आहे.

बैल हा केवळ शेतीचा साथीदार नसून तो आपल्या कृषी संस्कृतीचा आणि ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक आहे. आधुनिकतेच्या युगात प्रगती करत असतानाच आपल्या मातीतली परंपरा, संस्कृती आणि शेतकऱ्यांप्रती असलेली कृतज्ञता जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# रस्त्याच्या मागणीसाठीचे उपोषण अखेर

## आ. रमेश बोरनारे यांच्या आश्वासनाने मागे




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुक्यातील घोडेगाव ते तांदुळवाडी व डोमेगांव या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रेटचे व इतर गाव जोडणाऱ्या रस्त्यांचे कामे मार्गी लावण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी १ सप्टेंबर पासून सुरू केलेले बेमुदत साखळी उपोषण आमदार प्रा. रमेश बोरनारे यांनी आश्वासन देत येत्या मार्च पर्यंत कामे मार्गी लावण्यात येणार असल्याचे आश्वासन देत उपोषणकर्त्यांना लिंबू पाणी देऊन उपोषण सोडण्यात आले. गंगापूर तालुक्यातील तांदुळवाडी ते घोडेगाव, डोमेगाव रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करावे, तसेच घोडेगाव ते कनकोरी, सिद्धनाथ वाडगाव, खादगाव आणि पळसगाव या रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करावे अन्यथा उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे निवेदनात देण्यात आला होता परंतु संबंधित विभागाकडून कोणतीही दखल घेतली नसल्याने अखेर ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी याच रस्त्यावर १ सप्टेंबर पासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. ९ दिवस चाललेल्या उपोषण स्थळी आमदार प्रा. रमेश बोरनारे यांनी येऊन घोडेगाव ते तांदुळवाडी या पाच कीलोमीटर रोडचे येत्या मार्च पर्यंत सिमेंट कॉंक्रेटचे रोड बनवून देण्यात येईल व इतर रस्त्याचे कामांना देखील निधी उपलब्ध करून लवकर करण्यात येणार असल्याचे आश्वासन देत उपोषणकर्त्यांना लिंबू पाणी देऊन उपोषण सोडवण्यात आल्याने ग्रामस्थांनी सुरू असलेले उपोषण मागे घेतले. यावेळी आ. प्रा.रमेश बोरनारे, तुर्काबाद गटाचे जिल्हा परिषद सदस्य योगेश पाटेकर, पंचायत समितीचे उपसभापती राजेश्वर हिवाळे, पंचायत समिती सदस्य दादा पाटील जगताप, आ. बोरनारे यांचे स्विय सहाय्यक प्रदीप साळुंके, लक्ष्मण सांगळे, सरपंच अनील राजगिरे, सरपंच जगदीश साळुंके, महेंद्र गंडे, सुनील पोळ काळवणे तसेच सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे अधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वैजापूर-गंगापुरात ९९.८४ टक्के कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

वैजापूर : कुणबी प्रमाणपत्रांसह मराठा आरक्षणाच्या विविध मुद्द्यांवर राज्य सरकारला इशारा देत मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टपासून उपोषणाला बसले आहेत. या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासनाकडून कुणबी प्रमाणपत्रांच्या वितरणाचा सातत्याने आढावा घेतला जात असून, वैजापुर आणि गंगापुर तहसीलमध्ये ९९.८४ टक्के प्रमाणपत्रे वितरित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत वैजापुर आणि गंगापुर तहसीलचे उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, शिंदे समितीच्या सर्वेक्षणादरम्यान वैजापुरमध्ये ६८७ तर गंगापुरमध्ये ७६१ विविध रेकॉर्ड प्राप्त झाले होते. या रेकॉर्डच्या आधारे वैजापुरमधून ४,८४२ आणि गंगापुरमधून २,०४७ अशा एकूण ६,८८९ नागरिकांनी अर्ज केले होते.

यातील ६,८७८ अर्जदारांना कुणबी प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे, हैदराबाद गॅझेटच्या आधारे ५३ जणांनी अर्ज केले होते, त्यापैकी ४१ जणांना प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. डॉ. जऱ्हाड यांनी पुढे सांगितले की, गुरुवार १० सप्टेंबर ते १७ सप्टेंबर दरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांच्या माध्यमातून नियमानुसार विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र सुलभतेने उपलब्ध करून दिले जाईल. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे नागरिकांसह विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# मातृशाळेच्या ऋणातून उतराई ; 'चैतन्य'चा मदतीचा हात

## २५ वर्षांनंतरची मैत्री पुन्हा फुलली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शाळेतील मैत्रीच्या आठवणी जपत मातृशाळेच्या विकासासाठी योगदान देण्याचा आदर्श सन २०००-२००१च्या दहावीच्या 'चैतन्य ग्रुप'ने घालून दिला आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, श्रीशिवाजीनगर संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजला गेल्या दोन महिन्यांत सुमारे एक लाख रुपयांच्या शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने कृतज्ञता सोहळा उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अरुण तनपुरे होते. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, सेवानिवृत्त शिक्षक हारदे, गाडे, भंडारी व वाकचौरे यांच्यासह माजी विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक बाबासाहेब शिरसाठ यांनी प्रास्ताविकात चैतन्य ग्रुपच्या कार्याची माहिती दिली. ग्रुपने शालेय गणवेश, वह्या, १२ सायकली, नऊ व्हाईट बोर्ड,




दोन पोर्टेबल ध्वनियंत्रणा, स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे ४० संच तसेच ११ हजार रुपयांचे रंगकाम साहित्य शाळेला दिले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नऊ व्हाईट बोर्डचे अनावरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात अरुण तनपुरे यांनी चैतन्य ग्रुपच्या कार्याचे कौतुक केले. समाजहितासाठी आणि शैक्षणिक कार्यासाठी समाजमाध्यमांचा सकारात्मक वापर करता येतो, याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थापक अध्यक्ष अमित देशमुख यांनी २५ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणत 'एक हात मदतीचा, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा' ही संकल्पना पुढे नेली. सेवानिवृत्त शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेची संरक्षण भिंत, रंगकाम आणि राहुरी पब्लिक स्कूलच्या विकासासाठी आगामी काळात प्रयत्न करण्याची ग्वाही देण्यात आली. माजी विद्यार्थ्यांचा गेट - टुगेदर आयोजित करण्याची कल्पनाही यावेळी मांडण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या निमसे यांनी केले, तर अभय पाटील यांनी आभार मानले.



# श्री क्षेत्र सराला बेटावर पोळा सण पारंपारिक पद्धतीने साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : श्रीक्षेत्र सरला बेट येथे पारंपारिक बैल पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चांगला पाऊस होऊ दे, बळीराजा सुखी होऊ दे! असा आशीर्वाद सरला बेटाचे प्रमुख महंत रामगिरीजी महाराज यांनी दिला. श्रीक्षेत्र गोदावरी धाम (सराला बेट) बैलपोळा सण पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते बेटातील बैलांचे पूजन करण्यात आले. यावेळी सरला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज, मधुसूदन महाराज, यांच्यासह बेटातील विद्यार्थी वृंद, महाराज उपस्थित होते. महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते बैल तसेच गाईंना पुरणपोळीचा प्रसाद देण्यात आला.

यावेळी बोलताना म्हणून रामगिरी महाराज म्हणाले, बैल हा शेतकऱ्यांचा आवडता आहे. पूर्वी व आताही काही भागात बैलांनी शेती केली जाते. आपल्या संस्कृतीमध्ये बैल गाईंना खूप महत्त्व आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी आहे. दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. परंतु आता भगवंताने शेतकरी सुखी व्हावा म्हणून चांगला पाऊस द्यावा, दुष्काळी परिस्थिती दूर व्हावी, बळीराजा सुखी व्हावा, अशी प्रार्थना त्यांनी केली. मुक्या प्राण्याची पूजा करून त्यांचं दर्शन घेणारा आपला भारतीय समाज, भारतीय संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ आहे. गायींना आपल्या संस्कृतीमध्ये गो मातेचा दर्जा आहे. असे सांगत महाराजांनी तमाम भाविकांना पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# २२ कोटींचे रुग्णालय, पण डॉक्टरच नाहीत !

## एका नर्सच्या भरवशावर रुग्णसेवा

**मोहन शेगर । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर**: गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांना गावाजवळच दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने घोडेगाव येथे शासनाने तब्बल २२ कोटी रुपये खर्चून अद्ययावत शासकीय रुग्णालय उभारले. कोट्यवधी रुपयांची अत्याधुनिक यंत्रसामग्रीही उपलब्ध करून देण्यात आली; मात्र डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे रुग्णालयाची आरोग्यसेवाच 'आजारी' पडल्याचे चित्र आहे. घोडेगावचे माजी सरपंच राजेंद्र देसरडा व ग्रामविकास अधिकारी रविंद्र देशमुख हे वृक्षलागवडीच्या अनुषंगाने रुग्णालय परिसराची पाहणी करण्यासाठी गेले असता, डॉक्टर उपस्थित नसल्याचे




निदर्शनास आले. केवळ एका नर्सच्या भरवशावर तीन ते चार रुग्ण उपचारासाठी असल्याचे दिसून आले.

डॉक्टरच उपलब्ध नसतील तर प्रशस्त इमारत, महागडी यंत्रसामग्री आणि शासनाचा कोट्यवधींचा खर्च कशासाठी, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. यापूर्वीही रुग्णालयातील मनुष्यबळाच्या कमतरतेबाबत वृत्त प्रसिद्ध झाले; मात्र परिस्थिती 'जैसे थे' असल्याची नागरिकांची तक्रार आहे. रात्री गंभीर रुग्ण दाखल झाल्यास तातडीची सेवा देण्यासाठी डॉक्टर उपलब्ध आहेत का, याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रुग्णालयात डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी व आवश्यक कर्मचारी तातडीने नियुक्त करून २४ तास प्रभावी आरोग्यसेवा सुरू करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# पोक्सोच्या गुन्ह्यातील आरोपीची निर्दोष मुक्तता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियमातील (पोक्सो) मधील गुन्ह्यातील अरोपीची निर्दोष मुक्तता करण्याचा महत्त्वपूर्ण निकाल गंगापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश राहुल शिंदे यांनी दिला आहे. गंगापूर तालुक्यातील दायगाव शिवारात घडलेल्या कथित घटने प्रकरणी गुन्हा क्रमांक २३७/२०२२ मधील कलम ८ व १२ तसेच भारतीय दंड संहिता कलम ३५४ अन्वये आरोपी विशाल देवकाते यांच्या विरोधात शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची सुनावणी गंगापूर जिल्हा व सत्र न्यायालयात होऊन खटल्यादरम्यान न्यायालयासमोर सादर करण्यात आलेले पुरावे, तसेच साक्षीदारांचे जबाब, बचाव पक्षातर्फे मांडलेले विविध कायदेशीर मुद्दे यांचा सखोल विचार करण्यात आला. त्यानंतर न्यायालयाने आरोपीविरुद्धचे आरोप सिद्ध झाले नसल्याचे मान्य करून आरोपी विशाल देवकाते यांची निर्दोष मुक्तता करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय देत अरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपीतर्फे अॅड. विठ्ठल संजय काळे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. अॅड. अमान शेख, अॅड. शाहरुख पठाण व अॅड. राधेश्याम पवार यांनी सहकार्य केले.

## निधन

### ताराबाई थोरात



**उक्कलगाव:** श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथील ताराबाई भाऊसाहेब थोरात ( वय ७५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, पुतणे, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी व भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते अण्णासाहेब भाऊसाहेब थोरात तसेच शरद भाऊसाहेब थोरात यांच्या त्या मातोश्री होत.

### प्रसाद पवार



**राहुरी** : शहरातील प्रगतिशील शेतकरी, राहुरी एम पी सोसायटीचे चेअरमन दिनकर प्रभाकर पवार यांचे चिरंजीव प्रसाद दिनकर पवार (वय ३१) यांचे नुकतेच अपघाती दुःख निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, आई, पत्नी, एक मुलगी, चुलते, भाऊ बहीणी असा मोठा परिवार आहे.

# मोबाईल दुरुस्तीच्या नावाखाली 'ब्लॅकमेलिंग'

## महिलेचा खाजगी फोटो व्हायरल करण्याची धमकी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर,**: मोबाईल दुरुस्तीसाठी दिलेल्या फोनमधील खासगी छायाचित्रे हाती लागल्यानंतर त्याच छायाचित्रांचा आधार घेत एका महिलेवर दबाव आणून पैसे उकळल्याचा आणि तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवण्याचा धक्कादायक प्रकार लोणी खुर्द येथे समोर आला आहे. 'फोटो नातेवाईकांना पाठवून व्हायरल करतो', या धमकीने महिलेची कोंडी करण्यात आली, या प्रकरणी ३६ वर्षीय मोबाईल दुकानदाराविरुद्ध लोणी पोलिसांनी गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

**मोबाईल दुरुस्तीसाठी देताना सावधान!**

या घटनेने मोबाईल दुरुस्तीच्या नावाखाली वैयक्तिक फोटो, व्हिडिओ आणि अन्य संवेदनशील माहितीच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणला आहे. मोबाईल दुरुस्तीसाठी देताना शक्य असल्यास खासगी डेटा सुरक्षित ठेवणे, आवश्यक नसलेली माहिती काढून ठेवणे आणि पासवर्डबाबत विशेष काळजी घेणे गरजेचे असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे. आरोपीने खासगी डेटा नेमका कसा मिळवला आणि या प्रकरणात आणखी कोणी बळी पडले आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

पोलिसांकडे दाखल फिर्यादीनुसार, संबंधित महिलेने २०२४ मध्ये मोबाईल खराब झाल्याने तो लोणी खुर्द येथील अशफाक मोहम्मद इसाक शेख याच्या दुकानात दुरुस्तीसाठी दिला होता. मोबाईलचा पासवर्ड आणि लॉकची माहितीही त्याला देण्यात आली होती. मोबाईल दुरुस्त झाल्यानंतर काही दिवसांनी आरोपीने संपर्क साधून फोनमधील खासगी छायाचित्रे आपल्याकडे असल्याचे सांगितले. तसेच ते वायरल करण्याची धमकी ही दिली. धमकीचा प्रकार नियमित चालू झाला. महिलेने भेटण्यास नकार दिल्यास खासगी फोटो नातेवाईकांना पाठवून बदनामी करण्याची तसेच ते व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली असे महिला फिर्यादीने दाखल केले आहे. या दबावामुळे महिलेने वेळोवेळी ऑनलाइन आणि रोख स्वरूपात सदर दुकानदार व्यक्तीला सुमारे ५० हजार रुपये दिले. मात्र, पैसे दिल्यानंतरही त्या व्यक्तीच्या धमक्या थांबल्या नाहीत.

फिर्यादीत आरोपीने ब्लॅकमेलिंगच्या माध्यमातून महिलेच्या इच्छेविरुद्ध वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मे २०२६ पर्यंत शिर्डीतील एका हॉटेलमध्ये बोलावून अत्याचार केल्याचेही तिने पोलिसांना सांगितले. त्यानंतरही विविध मोबाईल क्रमांकांवरून संपर्क साधून भेटण्यासाठी दबाव आणला जात होता.

९ सप्टेंबर रोजी पुन्हा फोन करून भेटण्यासाठी येण्यास सांगण्यात आले. अन्यथा खासगी फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याने त्रस्त झालेल्या महिलेने अखेर लोणी पोलीस ठाणे गाठले. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा क्रमांक ४६५/२०२६ दाखल केला. भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अद्याप अटक झालेली नाही. लोणी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि युवराज आठरे आणि शिर्डी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला. पुढील तपास पोसई आशिष चौधरी करीत आहेत.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 350 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 17/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 24/08/2026 | 240 6 | | | | |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**शुक्रवार दि. ११ सप्टेंबर २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | १५६ २४६ ६६० | ९ | २७० ४५० १४४ | ३ | १२० ६७० ३८० |

६२-२४-१९-९०-७३-३८

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | २३० २५० १२२ | ७ | १२४ १७९ ७०० | ४ | १३० १४९ ४४६ |

८५-५१-२७-७९-६४-४०

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २३८ ४९० ६७० | ४ | १३० ३३८ ४०० | ० | १९० २८० २४४ |

७३-३१-९४-४५- ६०-८०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## द•ख•ल



### प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत गरोदर मातांची आरोग्य तपासणी

**राशिन :** प्राथमिक आरोग्य केंद्र, राशीन येथे प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत गरोदर मातांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या अभियानाच्या माध्यमातून गरोदर मातांच्या आरोग्याची नियमित तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी गरोदर मातांचे वजन, उंची, हिमोग्लोबिन, रक्तदाब, रक्तातील साखर तसेच तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आढळणाऱ्या आरोग्यविषयक बाबींची नोंद घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. व्हरकटे सर यांनी गरोदर मातांना संतुलित आहार, वैयक्तिक स्वच्छता, नियमित आरोग्य तपासणी आणि आरोग्याची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. गरोदरपणातील योग्य आहार व वेळेवर तपासणीचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. या आरोग्य अभियानासाठी डक्त गायकवाड सिस्टर, लॅब टेक्निशियन तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका आणि आशा सेविका उपस्थित होत्या. अभियानाच्या माध्यमातून गरोदर मातांना आवश्यक आरोग्यसेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले.

### दीर्घकाळ प्रशासक राज हा लोकशाहीवर गंभीर आघात : सुरेश पाटेकर

**हातगाव :** ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये दीर्घकाळ प्रशासक राज रहाणे हा लोकशाहीवर झालेला गंभीर आघात आहे असे मत सेवानिवृत्त सहाय्यक गटविकास अधिकारी सुरेश पाटेकर यांनी व्यक्त केले. प्रशासक राजचा पायंडा पुढे चालू राहिल्यास भविष्यात राज्य आणि केंद्र शासनाच्या पातळीवरही असेच घडू शकते



आणि देशातील लोकशाही धोक्यात येऊ शकते याची जाणीव सर्वांनीच ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील २० जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समितीमध्ये एकूण आरक्षण ५० % पेक्षा जास्त आहे त्या ठिकाणचा गुंता लवकरच शासनाने सोडवावा तसेच राज्यातील अनेक ग्रामपंचायतीचा कार्यकाल संपलेला असून तेथेही प्रशासक राज चालू आहे. फेब्रुवारीपासून आणखी १४२४० ग्रामपंचायतीवर प्रशासक राज आलेले आहे. निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत,पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुका लवकरात लवकर घ्याव्यात अशी मागणी पाटेकर यांनी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जाती व जमातीप्रमाणेच ओबीसी आरक्षण देखील प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेतील त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले तसेच अनुसूचित जाती जमातीचे आरक्षण धरून एकूण आरक्षण ५०% च्या मर्यादेपेक्षा अधिक होऊ नये असेही निर्देश देण्यात आलेले आहेत. एकूण आरक्षण ५०% च्या मर्यादेपेक्षा जास्त नाही अशा ठिकाणच्या १२ जिल्हा परिषद व त्या अंतर्गत पंचायत समितीची निवडणुका व नगरपालिका व महानगर पालिका निवडणुका संपन्न झाल्या असून तेथे लोकनियुक्त संस्था अस्तित्वात आल्या असल्याचेही शेवटी पाटेकर यांनी सांगितले आहे.

### अखंड हरिनाम सप्ताहाचा रायतळे येथे उत्साहात समारोप



**जातेगाव :** ब्रह्मलीन ब्रह्मनिष्ठ सद्गुरू महादेव महाराज काळे यांच्या कृपाशीर्वादाने रायतळे या तीर्थक्षेत्रात सन १९८५ पासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. अत्यंत काटेकोर नियोजनातून सुरू झालेली ही आध्यात्मिक परंपरा आजही मोठ्या भक्तिभावाने पुढे सुरू आहे. सद्गुरू महादेव महाराज काळे यांनी सुरू केलेल्या या सप्ताहातून रायतळे गावातील आध्यात्मिक वारसा जपण्याचे व पुढे नेण्याचे कार्य होत आहे. भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. अमोल महाराज सातपुते यांनी सद्गुरू महादेव महाराज काळे यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा पुढे नेली.

### ढोरजळगांवला बैल पोळा सण उत्साहात साजरा

**ढोरजळगांव :** ढोरजळगांव परीसरातील शेतकरी बांधवांनी आपल्या सर्जा-राजाची पूजा करून बैल पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. यानिमित्त बैलांना धुवुन त्यांना रंगीबेरंगी झुली, गोंडे व फुलांच्या माळांनी सजवण्यात आले होते. सकाळपासूनच शेतकऱ्यांची लगबग सुरू होती. बैलांच्या शिंगांना रंग लावून त्यांची आकर्षक सजावट करण्यात आली. घरातील महिलांनी बैलांची औक्षण करून पूजा केली व पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला. गावातून सजवलेल्या बैलांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी लहान मुले तरुण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा सण असल्याने गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शेतकऱ्यांनी वर्षभर शेतीच्या कामात साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

### आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते स्वप्नील खामकरच्या पुस्तकाचे प्रकाशन

**अहिल्यानगर :** स्वप्नील खामकर यांच्या 'भारत : द इटर्नल' या सहाव्या पुस्तकाचे प्रकाशन आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्यास संजय खामकर, संदीप घनदाट, अमन आंबेडकर, बालाजी सोनटक्के, सुरेश बनसोडे, मधुकर घनदाट, मच्छिंद्र दळवी, प्रतिभा खामकर, आण्णासाहेब खैरे, गुणगौरव सोहळा समितीचे संतोष कानडे, सुरेश शेवाळे, अरुण गाडेकर, सुभाष सोनवणे, संजय कानडे, राजेंद्र धस, सुनील धस, रामदास सातपुते, पाराजी साळे, सुरेश शेवाळे, भारत चिंधे, मनिष कांबळे, आरती सोनग्रा, अरुणा गोयल, रुक्मिणी नन्नावरे उपस्थित होते.

# जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करा

## खा. लंकेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्यामुळे चालू खरीप हंगामातील पिके संकटात सापडली असून अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप हंगाम अक्षरशः वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून प्रशासनाने तातडीने चारा छावण्या व पाण्याचे टँकर सुरू करावेत, पिकांचे पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांनी केली.

यासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. जिल्ह्यातील पावसाची सद्यस्थिती, पीक परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करावेत, तसेच बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत मिळवून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी नगरसेवक योगीराज गाडे, सरपंच शरद पवार, माजी सभापती बाळासाहेब हराळ, बाबासाहेब तरटे, शशि गव्हाणे, निलेश मालपाणी, अरुण म्हस्के, महादेव कोकाटे, अभिजीत ससाणे - सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष, गणेश तोडमल, शिवा पाटील होळकर, शेखर पांचमुख - तालुकाध्यक्ष, संजू कांबळे, अथर खान - अल्पसंख्याक अध्यक्ष, अझहर शेख - शहर कार्याध्यक्ष, अर्चना गायकवाड - महिला शहराध्यक्षा, योगिता राजळे - महिला जिल्हाध्यक्षा, प्रकाश पोते - जिल्हा उपाध्यक्ष, रामवाणी, रवी घनवटे, फयाज तांबोळी आदींसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार निलेश लंके यांनी निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यात चालू खरीप हंगामात अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्यामुळे अनेक भागांमध्ये गंभीर पाणीटंचाई व दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पिके मोठ्या संकटात सापडली आहेत.

विशेषतः सोयाबीन, तूर, उडीद, कपाशी तसेच इतर खरीप पिकांच्या उत्पादनावर पावसाच्या कमतरतेचा मोठा विपरीत परिणाम झाला आहे. पिकांच्या निर्णायक वाढीच्या कालावधीत आवश्यक पाऊस न झाल्याने अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून, काही भागात पिके करपण्यास सुरुवात झाली आहे.

शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत व इतर शेतीकामांसाठी मोठा खर्च केला आहे. मात्र अपेक्षित उत्पादन मिळण्याची शक्यता अत्यंत कमी झाली आहे. त्यामुळे उत्पादन खर्चही भरून निघणार नसल्याने शेतकरी आर्थिकदृष्ट्या मोठ्या अडचणीत सापडला आहे.

पावसाअभावी पाणीसाठे कमी होत असल्याने ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा तसेच पशुधनासाठी पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर चारा उपलब्धतेवरही परिणाम होत असून पशुधनाचे संगोपन करणे शेतकऱ्यांसाठी कठीण होत आहे. या पार्श्वभूमीवर केवळ पंचनाम्यांची प्रक्रिया करून थांबता कामा नये. परिस्थितीचे तातडीने वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून प्रत्यक्ष शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याचे खासदार लंके यांनी निवेदनात नमूद केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पावसाची सद्यस्थिती, पीक परिस्थिती व पिकांच्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करण्यात यावेत.

## दुष्काळाचे सावटात कर्जतला श्रावणी पोळा साजरा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** शहरात आणि तालुक्यातील बहुतांश भागात गुरुवारी श्रावणीी बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला. यंदा अल्प पावसाने दुष्काळाचे सावट, वाढती महागाईमुळे बाजारपेठेत शुकशुकाट जाणवला. मात्र काही ठराविक शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या सर्जा-राजासाठी मोठ्या आनंदाने खरेदी करीत बैलपोळा साजरा केला. शहरातील कापरेवाडी वेस येथे सजवलेले सर्जा-राजा सर्वांचे लक्ष वेधत होते.

यंदा मान्सून पावसाने चांगलीच दडी मारल्याने त्याचा परिणाम श्रावणी बैलपोळ्यावर जाणवला. बाजारपेठेत सर्जा-राजाच्या श्रृंगारासाठी दुकाने सजली गेली होती. मात्र पावसाचे अल्प प्रमाणाने दुष्काळाचे सावट, साहित्याचे वाढलेले दर यामुळे सर्वसामान्य शेतकरीवर्ग मेटाकुटीला आला. मात्र अशा आवस्थेत देखील सकाळपासूनच लाडक्या सर्जा-राजास स्वच्छ पाण्याने अंघोळ घालीत त्यास रंगविण्यात आले होते.

पाठीवर मखमली झुल, कानास गोंडा, शिंगास मोर पिसे, पायाला छमछम वाजणारे घुंगरूने वातावरण दुमदुमले होते. लाडक्या सर्जा आणि राजाला गुलालात तर काही पशुपालकांनी हळदाची उधळण करीत ढोल-ताशात वाजतगाजत बैलजोड्या कापरेवाडी वेशीत आणल्या.

शेवटी पोळा फुटताच आपआपल्या घरी विधीवत पूजा करून सर्जा-राजास गोड घास भरविण्यात आला. यांत्रिकीकरण शेतीमुळे अगोदरच बैलजोडी नामशेष होताना दिसत आहे. त्यामुळे यंदाच्या बैलपोळ्यास बैल जोडी संख्या कमालीची घटली होती.

## अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरण

### फरार आरोपींच्या अटकेसाठी पीडित कुटुंबीयांचे उपोषण सुरु

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील फरार आरोपींना तातडीने अटक करावी आणि तपासात निष्पक्षता आणावी, या मागणीसाठी अवधुत उत्तम गोरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने अखेर लोकशाही मार्गाने हे पाऊल उचलावे लागल्याचे त्यांनी सांगितले.

सदर प्रकरणात पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे झाली असली तरी सुरुवातीपासूनच तपासात दिरंगाई होत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. तपासादरम्यान तपासी अंमलदारांची झालेली बदली आणि पुराव्यांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे तपासाच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार बापूसाहेब आसाराम म्हस्के याच्यासह सहआरोपी शिंदे (रा. तुमसर, जि. भंडारा) तसेच अंबादास पुंडे याला जामीन मिळाली असून अनिल पिसे, किरण कराळे, पुरुषोत्तम आठरे व इतर आरोपी अद्याप मोकाट आहेत. आरोपी व त्यांचे नातेवाईक पीडित कुटुंबावर तक्रार मागे घेण्यासाठी राजकीय व इतर माध्यमातून दबाव आणत असून जीवे मारण्याच्या धमक्या देत असल्याचा गंभीर आरोपही उपोषणादरम्यान करण्यात आला असुन मुख्य मागणी आहे की, सर्व फरार आरोपींना तातडीने अटक करून कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. पीडितेचे सर्व वैद्यकीय अहवाल, डीएनए आणि फॉरेन्सिक पुरावे सुरक्षित ठेवून तपासात समाविष्ट करावेत. घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज आणि कॉल रेकॉर्ड्सची सखोल चौकशी व्हावी. पीडित मुलगी व तिच्या कुटुंबाला तातडीने पोलीस संरक्षण पुरवले जावे. मागण्या पूर्ण होईपर्यंत हे उपोषण असेच सुरू राहील, असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

## शिक्षक भावी पिढीला दिशा देणारे दीपस्तंभ : लंके गुरुजी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शिक्षक हे भावी पिढीला मार्ग दाखविणारे आणि विद्यार्थ्यांच्या मनात विचारांची पेरणी करणारे दीपस्तंभ आहेत. आजच्या बदलत्या काळातही शिक्षकांना समाजात सन्मानाचे स्थान असून, त्यांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करण्याची गरज आहे. साहित्य हे समाजाला दिशा देणारे प्रभावी माध्यम असून, ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न, समस्या, संस्कृती आणि जीवनाचे वास्तव प्रभावीपणे प्रतिबिंबित होत असल्याचे प्रतिपादन ज्ञानदेव लंके गुरुजी यांनी केले. निमगाव वाघा (ता. नगर) येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरुवारी (दि. १० सप्टेंबर) आठवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. साहित्यिक सीए डॉ. प्रकाश अंदानी यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी स्वागताध्यक्षा साहित्यिक हेमलता गिते, संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे, कवी रुपचंद शिदोरे, माजी सरपंच साहेबराव बोडखे, उद्योजक दिलावर शेख, सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, मुख्याध्यापक चांद हुसेन शेख, गोकुळ जाधव, भागचंद जाधव, लक्ष्मण चौरे, डॉ. विजय जाधव, भाऊसाहेब जाधव यांच्यासह साहित्यिक, कवी, शाहीर आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑल इंडिया इंटर-स्कूल शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये अहिल्यानगरच्या अन्विता जाधवचा सुवर्णवेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथील रहिवासी असलेल्या आणि आपल्या अचूक नेमबाजीने राज्याचे नाव उंचावणाऱ्या उदयोन्मुख नेमबाज अन्विता विजय जाधव हिने २८ व्या ऑल इंडिया कुमार सुरेंद्र सिंग इंटर-स्कूल शूटिंग चॅम्पियनशिप २०२६ मध्ये सुवर्णपदक पटकावून सुवर्णमय कामगिरी केली आहे.

अहिल्यानगर येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन इंग्लिश मीडियम स्कूल, विळद घाट ची विद्यार्थिनी असलेल्या अन्विताने या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व केले. १० मीटर पीप साईट एअर रायफल सब युथ वुमन गटात झालेल्या सांघिक प्रकारात महाराष्ट्र संघाची महत्त्वपूर्ण सदस्य म्हणून खेळताना अन्विताने उत्कृष्ट कामगिरी बजावली आणि संघाला अव्वल स्थान मिळवून देत मानाचे सुवर्णपदक मिळवून दिले. नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया द्वारे या प्रतिष्ठित स्पर्धे चे आयोजन ३० ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत भोपाळ येथे करण्यात आले होते. अन्विताला हे नेत्रदीपक यश शाळेच्या प्राचार्या श्रीमती नम्रता ओहरी शाळेतील शिक्षक, तसेच तिचे मार्गदर्शक व प्रशिक्षक श्री. छबुराव काळे आणि श्री. ऋषिकेश दरंदले यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे मिळाले आहे.

अन्विताच्या या ऐतिहासिक आणि सुवर्णमयी कामगिरीबद्दल तिचे मूळ गाव देवीभोयरे, शालेय व्यवस्थापन, शिक्षक वृंद आणि संपूर्ण जिल्ह्यातून क्रीडाप्रेमींकडून तिच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बोडखेंच्या नेतृत्वाखाली माध्य. शिक्षक सोसायटी प्रगतीपथावर : आ. जगताप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध नियुक्ती झाल्याबद्दल शिक्षक नेते बाबासाहेब बोडखे यांचा आ. जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बाबासाहेब बोडखे हे चळवळीतून घडलेले नेतृत्व असून, सामाजिक कार्यातही त्यांचा सातत्याने पुढाकार राहिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षक सोसायटी निश्चितच प्रगतीपथावर जाईल, असा विश्वास आ. संग्राम जगताप यांनी व्यक्त केला. यावेळी प्रा. माणिक विधाते, आप्पासाहेब शिंदे, प्रा. सुधाकर सुंबे, महेंद्र हिंगे, राजेंद्र कोतकर, प्रा. शिवाजी घाडगे, प्रा. दत्तात्रय दरेकर, प्रा. निलेश बांगर, स्वप्निल इथापे, दीपक आमटे आदी उपस्थित होते.

पुढे आमदार जगताप म्हणाले की, अवघ्या काही दिवसांच्या कालावधीत संस्थेत तब्बल २२ कोटी ४२ लाख रुपयांच्या ठेवी जमा करून संस्था स्वभांडवली करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हा उपक्रम अत्यंत महत्त्वाकांक्षी असून, त्याला सभासदांकडून मिळत असलेला प्रतिसाद कौतुकास्पद आहे. संस्थेवरील अनावश्यक खर्च कमी करून उपलब्ध आर्थिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याच्या दिशेने सुरू असलेले कामही महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. बाबासाहेब बोडखे म्हणाले की, माध्यमिक शिक्षक सोसायटीमध्ये परिवर्तन मंडळाची सत्ता आल्यानंतर सभासद हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन संस्थेचा कारभार सुरू करण्यात आला आहे.

# कारगिलच्या दुर्गम भूमीत 'पंचकोश' शिक्षणाचा दीप!

## अहिल्यानगरचे अशोक सचदेव यांचे शिक्षकांना मार्गदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बर्फाच्छादित पर्वतरांगा, खडतर भौगोलिक परिस्थिती आणि दैनंदिन जीवनातील असंख्य आव्हाने... अशा परिस्थितीतही शिक्षणाची आस मनात बाळगून दररोज मोठे अंतर पार करून शाळेची वाट धरणाऱ्या कारगिलमधील विद्यार्थ्यांच्या जिद्दीला बळ देण्यासाठी त्या भागात कार्यरत असलेल्या शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच पार पडला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित 'पंचकोश शिक्षण पद्धती' या विषयावर कारगिल, लडाखच्या प्रशिक्षणामध्ये अहिल्यानगर शहरातील चित्रकुट इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक सचदेव यांनी पंचकोश शिक्षण पद्धतीवर सविस्तर मार्गदर्शन केले. पंचकोश शिक्षण पध्दतीचा सर्वाधिक लाभ वयोवर्षे २ ते ६ वर्षातील विद्यार्थ्यांसाठी होतो.

या विशेष प्रशिक्षणासाठी संपूर्ण भारतातून निवडक व्यक्तींना व्याख्यान व मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यामध्ये अशोक सचदेव यांचा समावेश करण्यात आला. कारगिलसारख्या दुर्गम प्रदेशातील



विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा, शिक्षकांचे प्रयत्न आणि भारतीय मूल्यांवर आधारित सर्वांगीण शिक्षण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अशोक सचदेव यांनी पंचकोश संकल्पनेतील अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय कोश यांची सविस्तर मांडणी केली. विद्यार्थ्यांचा केवळ अभ्यासातील बौद्धिक विकास न करता त्यांच्या शरीराचा, प्राणशक्तीचा, मनाचा, बुद्धीचा तसेच आनंदी आणि संतुलित व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय शिक्षणपरंपरेतील ही प्राचीन आणि समग्र संकल्पना आधुनिक शिक्षणव्यवस्थेत प्रभावीपणे रुजविण्याचा प्रयत्न राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून होत आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रत्येक पैलूला स्पर्श करणारे शिक्षण देणे, त्यांच्या क्षमता ओळखणे आणि त्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्यास सक्षम करणे, हा पंचकोश शिक्षणाचा केंद्रबिंदू असल्याचे सचदेव यांनी सांगितले. यावेळी अशोक सचदेव म्हणाले की, भारतीय शिक्षणपद्धतीची मुळे आपल्या संस्कृतीत आणि ज्ञानपरंपरेत खोलवर रुजलेली आहेत. पंचकोश शिक्षण विद्यार्थ्याच्या केवळ बौद्धिक विकासावर भर न देता त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा विचार करते.

कारगिलच्या भूमीत मिळालेला अनुभव शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक समृद्ध करणारा ठरला. अत्यंत कठीण परिस्थितीतही शिक्षणाची आस जपणारी मुले आणि त्यांच्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणारे शिक्षक पाहणे हा आयुष्यभर लक्षात राहणारा अनुभव आहे. या प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान आणि अनुभव शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून भारतीय मूल्ये आणि आधुनिक शिक्षण यांचा समन्वय साधण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

## दखल

### आदिवासी शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरी, शेततळे योजनेचा लाभ १७ सप्टेंबरपर्यंत अर्जाची संधी

**पुणे :** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांसाठी स्ट्रॉबेरी प्राथमिक लागवड किट, अस्तरीकरणासह नवीन शेततळे निर्मिती आणि अस्तित्वातील शेततळ्याचे अस्तरीकरण यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. आंबेगाव, जुन्नर, राजगुरुनगर आणि मावळ तालुक्यातील पात्र आदिवासी शेतकऱ्यांनी १७ सप्टेंबरपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. स्ट्रॉबेरी लागवड किटसाठी ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. तसेच शेततळे निर्मिती व अस्तरीकरणासाठी शासनाच्या निर्धारित मापदंडानुसार अनुदान उपलब्ध होणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार आदिवासी शेतकरी असणे आवश्यक असून, यापूर्वी इतर कोणत्याही योजनेतून स्ट्रॉबेरी लागवडीचा लाभ घेतलेला नसावा. इतर घटकांचा लाभ घेण्यासाठी स्ट्रॉबेरी प्राथमिक लागवड अनिवार्य आहे. स्ट्रॉबेरी लागवडीसोबत नवीन शेततळे किंवा अस्तित्वातील शेततळ्याचे अस्तरीकरण यापैकी एका घटकाचा लाभ घेता येणार आहे. मंजूर मापदंडापेक्षा अधिक होणारा खर्च लाभार्थ्याला स्वतः करावा लागणार आहे. अर्जासोबत ७/१२ उतारा, ८-अ उतारा, आधार कार्ड, जात प्रमाणपत्र किंवा दाखला, बँक पासबुकची प्रत आणि हमीपत्र आवश्यक आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी कार्यालयामार्फत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा.

### आश्रमशाळांत सर्पदंश प्रतिबंध अभियान

**पुणे :** आदिवासी विकास विभागाच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल निवासी शाळा आणि वसतिगृहांमध्ये १९ ते २६ सप्टेंबरदरम्यान 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान' राबविण्यात येणार आहे. याबाबतचे निर्देश आदिवासी विकास विभागाने दिले आहेत. डोंगराळ व वनक्षेत्रालगत असलेल्या संस्थांमध्ये साप, विंचू आणि इतर वन्यजीवांचा धोका लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना सुरक्षित वर्तन, सर्पदंश झाल्यानंतरची प्राथमिक उपाययोजना, अंधश्रद्धा व गैरसमज आणि तातडीने वैद्यकीय उपचार घेण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. शाळेच्या परिसरात जीवंत साप आणून प्रात्यक्षिक करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच मुख्याध्यापक, अधीक्षक व परिचारिका यांनी जवळचे आरोग्य केंद्र, सर्पविष प्रतिबंधक लस उपलब्ध असलेली आरोग्य संस्था, आपत्कालीन वाहतूक व्यवस्था आणि स्थानिक सर्पमित्रांचे संपर्क क्रमांक दर तीन महिन्यांनी अद्ययावत करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. आदिवासी विकास विभागाचे आयुक्त गोपीचंद कदम यांनी सांगितले की, दुर्गम भागातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी हे अभियान महत्त्वपूर्ण असून, आपत्कालीन परिस्थितीत योग्य वेळी उपचार मिळण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठीही अभियान उपयुक्त ठरणार आहे.

### मराठा आरक्षणासाठी शिरूरमध्ये रास्ता रोको



**शिरूर :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या सुरू असलेल्या उपोषणाची शासनाने तातडीने दखल घेऊन आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा, या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने शिरूर शहरातील जुन्या पुणे-अहिल्यानगर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी नायब तहसीलदार स्नेहल गिरगोसावी व पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. आश्वासने आणि चर्चेच्या नावाखाली आणखी विलंब न करता मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. मराठा समाजाने आतापर्यंत लोकशाही व शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्या मांडल्या आहेत. मात्र, वारंवार आश्वासने मिळूनही आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित राहिल्याने समाजात असंतोष वाढत आहे. शासनाने समाजाच्या संयमाची परीक्षा घेऊ नये, असा इशाराही यावेळी देण्यात आला. आंदोलनावेळी नगरपरिषद बांधकाम समिती सभापती सुनील जाधव, नगरसेवक सागर नरवडे, उमेश शेळके, अभिजित पाचर्णे, नगरपरिषद शिक्षण मंडळाचे माजी सभापती राजेंद्र जाधवराव, माजी उपसरपंच संभाजीराव कर्डीले, रमेश दसगुडे, अविनाश जाधव, योगेश महाजन, संपत दसगुडे, जयवंत साळुंखे, बाळासाहेब आवारी, अविनाश घोगरे, वैशाली गायकवाड, बंटी जोगदंड आदी उपस्थित होते.

### डीजेबंदीला राजकारण नको!

**यवत :** गणेशोत्सव जवळ येताच डीजे, ध्वनिप्रदूषण आणि डीजेबंदीचा मुद्दा पुन्हा चर्चेत येतो. उत्सव साजरा करण्याचा मंडळांना अधिकार असला, तरी नागरिकांच्या शांततेचा अधिकारही महत्त्वाचा आहे. त्यामुळे डीजेचा प्रश्न कमी आणि नियमांच्या समान अंमलबजावणीचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

गणेशोत्सव, दहीहंडी, लग्नसमारंभ किंवा राजकीय सभा असो, ध्वनिप्रदूषणाचे नियम सर्वांसाठी समान असावेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे; मात्र कारवाई करताना राजकीय दबाव, पक्षीय भूमिका किंवा भेदभावाला स्थान नसावे. डीजे-डॉल्बीवरील निर्बंध केवळ गणेश मंडळांसाठी न ठेवता राजकीय कार्यक्रमांनाही समान नियम लागू करावेत.मंडळांनी उत्सव साजरा करताना वृद्ध, लहान मुले, रुग्ण आणि विद्यार्थ्यांचा विचार करावा.

# सावित्रीबाई फुले विद्यापीठाने जागतिक दर्जाचे केंद्र बनावे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे जग वेगाने बदलत आहे. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे शिक्षण केंद्र म्हणून पुढे यावे, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२७ व्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, कुलसचिव प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.



राज्यपाल वर्मा म्हणाले, दीक्षान्त समारंभ हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा आहे. पदवी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आजीवन ज्ञानार्जन करत नवनवीन कौशल्ये आत्मसात करावीत. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून समानता, सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आहे. सावित्रीबाई फुले यांचा हा विचार विद्यार्थ्यांनी पुढे न्यावा.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बहुविषयक शिक्षण, कौशल्यविकास, संशोधन, नवोन्मेष, भारतीय ज्ञानपरंपरा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य द्यावे. डिजिटल प्रशासन आणि हरित उपक्रमांमुळे विद्यापीठ अधिक पारदर्शक, कार्यक्षम व शाश्वत होईल, असे त्यांनी सांगितले.

दुबई, सौदी अरेबिया आणि कझाकिस्तानमधील शैक्षणिक भागीदारीच्या माध्यमातून विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीयीकरण अधिक बळकट करावे. विद्यार्थी देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, आंतरराष्ट्रीय प्राध्यापक आणि जागतिक संस्थांशी भागीदारी वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले.

उद्योग क्षेत्रासोबत भागीदारी वाढवून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, इंटर्नशिप, शिकाऊ उमेदवारी, संशोधन व प्रत्यक्ष अनुभवाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. तसेच माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मार्गदर्शन, शिष्यवृत्ती, रोजगार आणि नवोन्मेषाला चालना द्यावी.

कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान बदल, आरोग्य, कृषी, सायबर सुरक्षा, शाश्वत विकास, ग्रामीण परिवर्तन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील संशोधनाला प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक विद्यार्थ्याला किमान एका क्रीडा किंवा शारीरिक उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे निर्देशही राज्यपालांनी दिले.

**कुलगुरूंकडून विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा :**

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी शैक्षणिक व संशोधन कामगिरीचा आढावा घेतला. विद्यापीठाशी संलग्न ८५९ महाविद्यालये व परिसंस्थांमध्ये साडेसात लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ज्ञाननिर्मिती प्रयोगशाळेपुरती मर्यादित न ठेवता ती समाज, गाव, शेत आणि रुग्णालयांपर्यंत पोहोचविण्यावर विद्यापीठाचा भर असल्याचे त्यांनी सांगितले. संशोधन, लोकाभिमुख तंत्रज्ञान, कौशल्यविकास, डिजिटल परिवर्तन आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून विद्यापीठाला नवी उंची देण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

## निर्भया पथकाचे जनजागृती अभियान

### निर्भया पथकाकडून विद्यार्थिनींना सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने पुणे ग्रामीण पोलिसांच्या निर्भया पथकाच्या वतीने डुंबरवाडी (ता. जुन्नर) येथील शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये जनजागृती अभियान घेण्यात आले.



ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथकातील महिला पोलिस कर्मचारी मयुरी खोसे यांनी विद्यार्थिनींना महिला विषयक कायदे, गुड टच-बॅड टच, समाजमाध्यमांवरील फसवणूक, सायबर गुन्हे तसेच आपत्कालीन परिस्थितीत स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी ११२, १०९१ आणि १०९८ या हेल्पलाइन क्रमांकांची माहिती देण्यात आली. तसेच दामिनी पथक, पोलिस मित्र ॲप आणि सायबर हेल्पलाइनचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. कोणतीही भीती न बाळगता पोलिसांशी संपर्क साधावा, पोलिस सदैव सोबत आहेत, असा विश्वास विद्यार्थिनींना देण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश दामा, सुमित जोशी, शीतल बिडकर, अभिषेक मेहेर, किरण महाजन, विजय वाकळे, वैशाली अडसरे, अस्मिता गायकवाड, चेतन पुलाते, अश्विनी गावडे, मृणाल राऊत, रेश्मा भोसले तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने निर्भया पथकाचे आभार मानण्यात आले.

## उमाजी नाईक जयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारगाव (शिंगवे) :** आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांची २३५ वी जयंती विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महिला बचत गटाच्या महिला तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




जयंतीनिमित्त जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी महिला बचत गटाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी शरद सहकारी बँक दौलतराव लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना राजे उमाजी नाईक यांच्या इतिहासाची माहिती दिली. ज्येष्ठ नागरिक संघाचे किसन ढोबळे, बबन लोखंडे, काळूराम लोखंडे, सचिन दातखिळे, शंकर देवडे, ज्ञानेश्वर आढवळे, शंकर दातखिळे, विवेक चव्हाण, रामदास रोडे, वर्षा रोडे, सायली रोडे, सोनाली रोडे यांच्यासह महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळेचे प्राचार्य संतोष लबडे व शिक्षकवृंद यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले. गुणवंत शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल शिक्षक विजय वळसे यांचा महिला बचत गटाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

## विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पती-सासूविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** तालुक्यातील रूई येथे १९ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. विवाहितेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती व सासूविरुद्ध बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुजल माऊली ननवरे (वय १९ वर्षे २ महिने) असे मृत विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी तिचे वडील दीपक हरिभाऊ रासकर यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, सुजलचा पती माऊली नामदेव ननवरे व सासू बायडाबाई नामदेव ननवरे यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप आहे. तसेच पतीने तिच्या इच्छेविरुद्ध अनैसर्गिक शारीरिक संबंध ठेवण्यासाठी जबरदस्ती केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सुजलने ९ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री



१२.३१ वाजण्यापूर्वी रूई येथील राहत्या घरी गळफास घेतल्याची नोंद पोलिसांनी केली आहे. या प्रकरणी माऊली नामदेव ननवरे व बायडाबाई नामदेव ननवरे यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ४२८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक अमोल कदम तपास करीत असून, पोलीस निरीक्षक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. घटनेमागील नेमके कारण तपासातून स्पष्ट होणार आहे.

## तांदुळवाडीत गॅससाठी नागरिकांची रस्त्यावर प्रतीक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** तांदुळवाडी परिसरातील भारत गॅस ग्राहकांना सिलिंडरसाठी रस्त्यावर तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. बुधवारी आणि शनिवारी गॅसची गाडी परिसरात येते. मात्र, घरपोच सिलिंडर मिळण्याऐवजी ग्राहकांना गाडी ज्या ठिकाणी येते तेथे जाऊन प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गॅसची गाडी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास परिसरात येते. मात्र, सिलिंडर मिळण्यासाठी अनेकदा दुपारनंतर किंवा सायंकाळपर्यंत प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे गॅस घेण्यासाठी घरातील एका व्यक्तीचा संपूर्ण दिवस खर्ची पडत आहे.

**नोकरी, शेतीची कामे सोडून प्रतीक्षा :**

तांदुळवाडी परिसरातील नागरिक नोकरी, व्यवसाय आणि शेतीच्या कामावर अवलंबून आहेत. गॅसच्या गाडीची प्रतीक्षा करण्यासाठी काम सोडावे लागत असल्याने आर्थिक तसेच वेळेचे नुकसान होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे.

**गॅसच्या गाडीवरील कर्मचाऱ्यांकडे घरपोच :**

**वितरणाबाबत विचारणा केली असता, 'कार्यालयाशी संपर्क साधा', असे सांगितले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.**

**संबंधित वितरकाने खुलासा करण्याची मागणी**




**ग्राहकांनी गॅसची नोंदणी केल्यानंतर त्यांना घरपोच सिलिंडर का दिला जात नाही, गाडी ठराविक ठिकाणी किती वेळ थांबते आणि ग्राहकांना तासन्तास प्रतीक्षा का करावी लागते, याबाबत संबंधित भारत गॅस वितरकाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचविण्यासाठी तांदुळवाडी परिसरात नियमित घरपोच गॅस वितरण व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी जोर धरत आहे.**

## भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी अशोक उमरगेकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी आळंदी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक अशोक उमरगेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड व प्रदेश महामंत्री आमदार माधवी नाईक यांनी उमरगेकर यांची निवड केली.

उमरगेकर यांनी आळंदी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक म्हणून काम केले असून, सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. पक्षाने सोपविलेली जबाबदारी लक्षात घेऊन अनुसूचित जाती समाजाच्या प्रश्नांसाठी तसेच समाजातील युवक, महिला आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



अशोक उमरगेकर म्हणाले, भारतीय जनता पक्षाने माझ्यावर विश्वास दाखवून प्रदेश उपाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी दिली आहे.

पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दिलेल्या या संधीबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. अनुसूचित जाती समाजाच्या विविध समस्या शासन दरबारी मांडून त्या सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. संघटन मजबूत करण्यासोबतच समाजातील युवकांना शिक्षण, रोजगार व विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहीन. उमरगेकर यांच्या नियुक्तीबद्दल भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने तसेच नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, भाजपा आध्यात्मिक आघाडीचे संजय महाराज घुंडरे, नगरसेवक रामचंद्र भोसले, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांनी अभिनंदन केले.

# एसआयआरमध्ये पात्र मतदारांचा समावेश करण्यासाठी सहकार्य करा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रक्रिया सुरू झाली असून, प्रत्येक पात्र मतदाराचा अंतिम मतदार यादीत समावेश होण्यासाठी राजकीय पक्षांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी आमदार बापूसाहेब पठारे, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, रोहयो सहआयुक्त तथा नोडल अधिकारी संजीव पलांडे, पुणे महापालिका अतिरिक्त आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी ओमप्रकाश दिवटे, पिंपरी-चिंचवड महापालिका अतिरिक्त आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी विक्रांत बगाडे, उपजिल्हाधिकारी मीनल कळसकर यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

तेली-उगले म्हणाल्या, मतदार यादीतील मयत, स्थलांतरित आणि दुबार नावे वगळून सर्वंकष मतदार यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. एकही पात्र मतदार यादीतून वगळला जाऊ नये तसेच अपात्र मतदाराचा समावेश होऊ नये, यासाठी ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. एसआयआरपूर्वीच्या ९० लाख ८० हजार मतदारांपैकी सुमारे २८ लाख मतदार एएसडीडी यादीत समाविष्ट झाले आहेत.

दुसऱ्या टप्प्यात ४ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. प्रारूप मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा छायाचित्रात विसंगती असल्यास मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यामार्फत ॲपद्वारे दुरुस्ती करून घ्यावी. राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी प्रारूप यादी तपासावी आणि सुनावणीवेळी मतदारांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहता येत नसल्यास प्रतिनिधीमार्फत कागदपत्रे सादर करता येतील. प्रतिनिधीही उपस्थित राहू शकत नसल्यास अधिकाऱ्यांमार्फत घरी जाऊन कागदपत्रे स्वीकारली जातील. तसेच मतदान केंद्र सुसूत्रीकरण करताना एका छताखाली राहणाऱ्या मतदारांचा समावेश शक्यतो एकाच मतदान केंद्रात करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

आमदार पठारे यांनी मतदार केंद्रनिहाय प्रारूप यादी उपलब्ध करून द्यावी तसेच मोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये सुनावणी आयोजित केल्यास नागरिकांना सोयीचे होईल, अशी सूचना केली. जिल्ह्यात या कार्यक्रमांतर्गत दर आठवड्याला राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात येत असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी मीनल कळसकर यांनी दिली.

# द • ख • ल

## पुण्याच्या पुढाऱ्यांचा नगर-सोलापूर डावा कालवा लाभधारक शेतकऱ्यांवर अन्याय!

**निघोज :** मोठ पाणलोट क्षेत्र असलेल्या डिंबा धरणाचे जास्तीच समुद्रा कडे वाहून जाणार पाणी माणिक डोह कडे वळवण्याच्या प्रयत्नांना खीळ बसली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या मंत्रिमंडळाने या कामाला स्थगिती देऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय केला असल्याची भावना निर्माण झाली असून या विरोधात संघटीतपणे आवाज उठविण्याची गरज असल्याचे आवाहन अखिल भारतीय किसान सभेचे पारनेर तालुका सचिव कैलास शेळके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. अगोदरच कुकडी प्रकल्पामधून जास्तीचं लाभक्षेत्र असलेल्या डाव्या कालव्याच्या हक्काचं पाणी पुणे जिल्ह्यातील पुढारी सातत्याने पळवतात, त्यात आता बोगद्याला विरोध करून म्हणजे विकासाला विरोध करून नगर सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अन्यायांमध्ये आणखी भर पडली आहे. अखिल भारतीय किसान सभा माजी मंत्री दिलीप वळसे पाटील आणि तत्सम पुढाऱ्यांच्या कोत्या दृष्टिकोनाचा तीव्र निषेध करत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी एकूणच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कुकडी प्रकल्पा च्या रचनेमध्ये सुधारणा करण्याचे जे प्रयत्न केले आहेत त्या प्रयत्नांना अखिल भारतीय किसान सभा पाठिंबा देत आहे. डिंबा ते येडगाव कॅनॉलचे अस्तरीकरण आणि डिंबा माणिक डोह जोडणारा बोगदा या दोन गोष्टींसाठी अखिल भारतीय किसान सभा तीव्र आंदोलन करेल असा इशारा शेळके यांनी दिला आहे.

## निघोज येथील संत सेना महाराज सभागृह सुशोभीकरणासाठी निधी देण्याची ग्वाही



**निघोज :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आपल्याला वरदहस्त असल्याने पारनेर तालुक्यात विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला असून निघोज येथील संत सेना महाराज सभागृह सुशोभीकरणासाठी मोठा निधी उपलब्ध करून देणार असून लवकरच भुमिपुजनासाठी येणार असल्याची ग्वाही जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेनेचे नेते सुजित झावरे पाटील यांनी दिली आहे. मंगळवार दि.८ रोजी निघोज येथील संत सेना महाराज सभागृहात संत सेना महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली , नाभिक समाज मंडळ, बारा बलुतेदार मंडळ, पारनेर तालुका पत्रकार संघ,निघोज ग्रामस्थ यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. माजी सरपंच ठकारामशेठ लंके, शिवसेनेचे युवा नेते पैलवान सुभाष वराळ, कांदा व्यवसायीक भिमाशेठ घुले, ॲड. गणेश लाळगे, तसेच निघोज व पंचक्रोशीतील गावातील नाभीक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोणी मावळा विकास सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी बाबाजी शेंडकर



**निघोज :** लोणी मावळा विकास सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी बाबाजी सहादू शेंडकर, तर व्हाईस चेअरमनपदी सत्यवान विष्णू शेलार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीची प्रक्रिया सहकार विभागाचे अधिकारी वाघमोडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. चेअरमन व व्हाईस चेअरमन या दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने बाबाजी सहादू शेंडकर आणि सत्यवान विष्णू शेलार यांची अनुक्रमे चेअरमन व व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा माजी चेअरमन, माजी व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, सभासद तसेच ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## प्रवीण झावरेंच्या शैक्षणिक कार्याचा जिल्हास्तरीय सन्मान



**टाकळी ढोकेश्वर :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविणारे, अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारे तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकळी ढोकेश्वर येथील शिक्षक प्रवीण झावरे सर यांना 'जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या शिक्षण विभागाच्या वतीने लोणी प्रवरा येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,आमदार किशोर दराडे,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवीण झावरे यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. झावरे यांनी आपल्या अध्यापन कार्यातून विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर,विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग, नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती तसेच शाळा आणि समाज यांच्यातील समन्वय वाढविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय ठरले आहेत. प्रवीण झावरे हे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष म्हणूनही कार्यरत असून शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी ते सातत्याने काम करीत आहेत. शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक आणि संघटनात्मक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग आहे. पुरस्कार सोहळ्यासाठी सरपंच विमलताई झावरे, बापूसाहेब तांबे,संतोष खामकर,रभाजी झावरे, पोपटराव झावरे,प्रल्हाद भालेकर,राजेंद्र ठोकळ, अंबादास झावरे,शिवाजीराव झावरे,नानासाहेब गाढवे, प्रताप खिलारी,संदीप झावरे,संदीप खिलारी,मंगेश खिलारी,प्रकाश नांगरे,चंद्रकांत गट,संदीप ठाणगे, किशोर भालेकर,ज्ञानेश्वर जाधव,संदीप गायकवाड, रामदास चौरे,प्रवीण साळवे,दादाभाऊ नवले,सुभाष खिलारी,आनंदा झरेकर,आशिष पठारे,दामोदर झावरे, प्रमोद झावरे,युवराज झावरे,चांदभाई शेख,बी.एम. झावरे,डॉ.अमोल झावरे,सतीश चव्हाण,बापूसाहेब गायके,प्रसाद झावरे,अरविंद वाबळे,संजय झावरे, संदीप बांडे,योगेश धुमाळ,महेश धुमाळ,नितीन दळवी, विशाल कुलट आदी उपस्थित होते.

# ३०० वर्षाची परंपरा असलेला मढीच्या पोळा!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**तिसगाव :** श्री क्षेत्र मढी परिसरात पोळा सण उत्सहात साजरा करण्यात आला. पाऊस नसल्यामुळे दुष्काळी परीस्थीती अद्यापही कायम आहे कानीफनाथांची पालखी ,भगवा ध्वज ,पंचधातुचा नांथाचा घोडा आग्रभागी राहुन नाथांचा जयजयकार करत मढी येथे बैल मिरवणुक संपन्न झाली .कानिफनाथ गडाच्या पाायरी दर्शनाने बैलपोळा उत्सवाची उत्साहात सांगता झाली .नाथांच्या मढी येथील पारंपारिक पोळ्याला सुमारे तिनशे वर्षांची परंपरा आहे.आधुनीक यांत्रीक शेतीमुळे बैलाची संख्या घटली आहे .दुष्काळामुळं या सणातील आनंद हिरावला गेलाय.

मढी येथील पोळा सणाची अनेक वर्षापासून सुरूअसलेली परंपरा शेतकऱ्यांनी टिकवून ठेवली आहे .काळाच्या ओघात शेतकऱ्यांचा यांत्रिकीकरणावर भर असला तरी आपली परंपरा जोपासत बैल पोळा उत्साहात संपन्न झाला .श्रावण महिण्यात दर शुक्रवारी नाथांची पालखी वाजत गाजत गावामधुन निघते शेवटची पालखी बैलासाठी निघते.

मढी येथे बैलासाठी मिरवणुकीत कसलेही मान पाण नाहीत सर्व मान कानीफनाथांच्या चरणी अर्पण करूण एकत्रीत पणे मिरवणुक निघते. बैलाच्या सनमानासाठी सांयकळी ५ वाजता नाथांची पालखी कानिफनाथ गडावरून वाजत गाजत खाली आली . गावामध्ये ठिकठिकाणी उभे असलेले बैल एकात्रीत होऊन नांथांची पालखी पुढे व सर्व शेतकरी बैल घेऊन पाठीमागे शांततेत निघाले . शेकडो वर्षापासून मढी येथे शांततेत पोळा साजरा करण्याची परंपरा आजही कायम आहे . मढी ग्रामस्थ व राज्याच्या विविध भागातून आलेल्या नाथभक्त पालखीच्या दर्शनासाठी मोठया संख्ये ने उपस्थित होते .सर्व सजलेली बैलांच्या जोड्यांची ढोल ताशाच्या गजरात ग्रामप्रदक्षणा मिरवणूक काढत हा सोहळा सप्पन्न झाला . शेतीत वाढलेला यंत्रांचा वापर अशा विविध कारणांमुळे बैलाच्या संख्यामध्ये लक्षणीय घट झाली आहे.श्रावण महिण्यात दर शुक्रवारी नाथांची पालखी वाजत गाजत गावामधुन निघते शेवटची पालखी बैलासाठी पोळ्याच्या दिवशी निघते .मढी येथे बैलांना जास्त सजवत नाहीत याच्या कारण नाथपंथाशी जोडले जाते नांथाचे राहणी साधी त्यामुळे बैलांना सजवत नाही बैलांच्या शिंगाणा फक्त विटकरी काऊ लावली जाते .ज्यांच्याकडे बैल नाही. त्यानी घरीच मातीच्या बैलांची पूजा करत पोळा सण साजरा करण्यात आला .या वेळी महिलांनी पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून बैलांची पूजा केली. श्रावणी अमवस्या असल्याने मढी, मायंबा, वृध्देश्र्वर व सावरगाव येथील स्वयंभु शनी देवाच्या दर्शनासाठी हजारो भावीकांची गर्दी केली होती.

तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्यामुळे बैलांना धुण्यासाठी नदी , विहीरी नाले किंवा पाझर तलावांमध्ये अद्यापही पाणी नाही. टँकरने विकत पाणी घेऊन घरी बादलीभर पाण्यात बैलांना अंघोळ घालण्यात आली.पोळा हा सण शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचा मानला जातो. आपल्याकडं असणाऱ्या या गोवंशांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण समजला जातो. त्यामुळं यादिवशी बैल जोडींना अंघोळ घालून सजवण्याची प्रथा आजही पाळली जाते. मात्र, दुष्काळामुळं या सणातील आनंद हिरावला गेलाय.

## शेवगाव तालुक्यात दुष्काळ जाहीर करा

### वंचित बहुजन आघाडीची मागणी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** चालू हंगामातील पावसाळ्याचे ३ महिने उलटले असून सप्टेंबर महिना अर्धा होत आला असताना सुद्धा शेवगाव तालुक्यात अजूनही सरासरी इतका पाऊस न झाल्याने तालुक्यात शेतीच्या शिंचनाबरोबरच पिण्याच्या पाण्याचा व पशुधनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात गंभीर होत चालला असल्याने व आता पावसाची शक्यता जवळपास मावळली असल्याने शासनाने आता कुठल्याही प्रकारे पावसाची वाट न पहाता तात्काळ दुष्काळ जाहीर करावा अशा आशयाचे निवेदन शेवगाव तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तहसीलदाराना देण्यात आले आहे. बाधित शेतकऱ्यांचे पंचनामे करून ५० हजारापर्यंत शेतकऱ्यांना ताबडतोब मदत करावी,शेतकऱ्यांचे कृषी कर्ज तातडीने माफ करावे, तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना तात्काळ पाण्याचे टँकर सुरू करावेत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा पीकविमा ताबडतोब मंजूर करून त्याचे लवकरच वाटप करावे.

निवेदनावर वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, प्यारेलालभाई शेख, रविंद्र निळ, ऑगस्टीन गजभिव, शाहूराव खंडागळे, बन्नूभाई शेख, धोंडीराम मासाळकर, सलीम जिलानी, विष्णू वीर, संतोष घोरपडे, दारासिंग भोंगळे,संजय मिसाळ, प्रदीप पटवेकर, सुर्यकांत भोंगळे, ऋषिकेश खंडागळे, चंदू मुकुटमल, लक्ष्मण मोरे, सुरेश खंडागळे, परमेश्वर मिर्झे, संदेश खंडागळे, विजय हुसळे यांच्यासह कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशादर्शक : चव्हाण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोरडगाव :** जीवनामध्ये शिक्षकांचे महत्त्व अनन्यसाधारण असून शिक्षक हे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्याचे काम करत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देऊन त्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात, असे प्रतिपादन प्राथमिक आश्रमशाळा कोनोशीचे मुख्याध्यापक संपत चव्हाण यांनी केले. आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या प्राथमिक आश्रमशाळा, कोनोशी येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात मुख्याध्यापक चव्हाण सर बोलत होते. शिक्षक दिनाचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत दिवसभर अध्यापनाची जबाबदारी पार पाडली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रमाणे वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना विविध विषयांचे अध्यापन केले. त्यामुळे शिक्षकाची भूमिका नेमकी काय असते, याचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव घेता आला. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा शिल्पकार असून, विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे महान कार्य शिक्षक करतात, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## श्रीगोंद्यात आदिवासी युवा क्रांती संघटनेचे आमरण उपोषण



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** दलित, आदिवासी तसेच भटक्या-विमुक्त समाजाच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आदिवासी युवा क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने गुरुवारी (१० सप्टेंबर) श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष अजित भोसले यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येत असून, प्रशासनाने मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त समाजातील अनेक कुटुंबांनी केलेल्या अतिक्रमणांचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. दरम्यान, पारधी समाजाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली असतानाही अनेक कुटुंबांकडे आधारकार्ड, रेशनकार्ड व इतर आवश्यक ओळखपत्रे नसल्याने शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याचा मुद्दा आंदोलकांनी उपस्थित केला. पारधी समाजासाठी विशेष शिबिर आयोजित करून पात्र नागरिकांना तातडीने आवश्यक ओळखपत्रे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. या उपोषणात अजित भोसले, जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड, रतन पवार, रामसिंग भोसले, मिथुन चव्हाण, उज्वला मदने, अविनाश चव्हाण, राहुल भोसले, नवनाथ भोसले, धिरज भोसले, काका काळे, रोहिणी राऊत आदी सहभागी झाले आहेत.

## श्रीगोंद्यात अखेर 'प्रशासकराज' कायम!

### फक्त कारभारी बदलले मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींचा कारभार शासकीय अधिकाऱ्यांकडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर अखेर 'प्रशासकराज' आले आहे. ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने आणि विद्यमान प्रशासकीय कालावधी संपुष्टात आल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे गावागावातील ग्रामपंचायतींचा कारभार आता लोकप्रतिनिधींपेक्षा थेट शासकीय यंत्रणेच्या हाती गेला आहे

ग्रामपंचायतीची मुदत संपल्यानंतर प्रशासक कोण होणार, याकडे गावपातळीपासून राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. प्रशासकपदावरून स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या हालचालींनाही आता पूर्णविराम मिळाला आहे. प्रशासनाने स्थानिक राजकीय व्यक्तीऐवजी शासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याने ग्रामपंचायतींवर थेट प्रशासकीय नियंत्रण आले आहे. त्यामध्ये शिरसगाव व वांगदरी यु. एस. अस्वर येळपणे, ढवळगाव, म्हसे, देवैली व उक्कडगाव: श्री. एम. आर. हराळ आढळगाव एस. बी. मछिंद्र उखलगाव, कोळगाव व गव्हाणेवाडी: पी. एस. यादव चिखली, कोळगाव व ढोरजा एम. एम. पांढरे पिंपरी कोलंदर, बांगर्डे रुईखेल एस. के. भोसले टाकळी कडेवळीत व शेडगाव: डी. ए. मांढरे मुंगुसगाव, घुगल वडगाव, बेलवंडी कोठार व भानगाव: श्री. के. पी. खोसे घोटवी, निमगाव खलू , सुरोडी सारोळा सोमवंशी एन. आर. बनकर, गार, चिखलठाणवाडी, वेळू व सांगवी दुमाला: एन. बी. बोरुडे, निंबवी, कोरेगव्हाण व चांभुर्डी : श्री. बी. आर. शिंदे, अरणगाव, कौठा व बाबुर्डी: ए. एस. कुताळ, हिंगणी दुमाला, हंगेवाडी व पिंपळगाव: एस. एल. भगत, कोरेगाव व सुरेगाव: श्री. पी. एम. हवालदार, कामठी व खांडगाव: श्री. एस. के. भोसले, घोडेगाव, चोराचीवाडी व चांडगाव: श्रीम. एस. बी. दातीर, पिंपरी कोलंदर, कोरी व रायगव्हाण: श्री. एस. व्ही. साळुंके, शिरसगाव बोडखा व देऊळगाव: श्री. ए. बी. कदू आणि श्रीम. पी. जी. आढाव, एरंडोली, म्हातार पिंपरी व वडाळी: श्रीम. एस. जी. थोरात, श्रीम. एम. एन. खेतमाळीस आणि श्रीम. ए. व्ही. कुऱ्हाड कर, यांच्यावरही प्रशासकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

## मिरजगावात चोरट्यांनी एकाच रात्रीत दोन दुकाने फोडली

### मुख्य बाजार पेठेतील घटना; व्यापारी वर्गामध्ये खळबळ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील मुख्य बाजार पेठेतील क्रांती चौक या भागात असलेले व्यापारी प्रसाद नंदकिशोर पंडित यांचे स्नेहा ज्वेलर्स आणि कल्याण कणसे यांचे साईमाया जनरल स्टोअर ही दोन दुकाने बुधवारी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दुकानांचे शटर धारदार शास्त्राने वाकवून चोरी करण्याचा प्रयत्न केला. परंतु याच भागातील राहणाऱ्या नागरिकांच्या सतर्कतेमुळे या चोरट्यांचा चोरीचा प्रयत्न असफल झाला. घटनास्थळी फॉरेन्सिक सायन्स लॅबच्या तज्ञांनी पाहणी करून दुकानांच्या शटर वरील फिंगरप्रिंट् घेतले आहे.

याबाबत मिरजगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरटयांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील कायम रहदारी असलेल्या वर्दळीच्या ठिकाणी मुख्य बाजारपेठेतील दुकान फोडल्याने शहरातील व्यापारी वर्गामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मिरजगाव शहरातील कायम वर्दळीचे ठिकाण असलेल्या क्रांती चौकात स्नेहा ज्वेलर्स व साईमाया जनरल स्टोअर हे दुकाने असून मध्यरात्री दुचाकी वाहनावर आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी या दुकानाचे शटर तोडून चोरी करण्याच्या उद्देशाने आत घुसण्याचा प्रयत्न केला. असताना याच भागातील काही नागरिक रात्रीच्या वेळी कामानिमित्त जागी असताना त्यांना शटर धारदार शास्त्राने कोणीतरी व्यक्ती वाकवत असताना आवाज आला निदर्शनास आले. आणि त्यांनी तात्काळ ज्वेलर्स व्यापारी प्रसाद पंडित यांना फोन केला. तोच लगेच याबाबत पोलिसांना कळविण्यात आले. आणि क्षणातच पोलीस व व्यापारी, ग्रामस्थ आल्याने चोरट्याने त्या ठिकाणाहून पालायान केले.

यावेळी दुचाकीवरून आलेल्या या अज्ञात चोरट्यांचा काही अंतरापर्यंत पोलिस व ग्रामस्थांनी सिनेस्टाईल पाठलाग करण्यात आला. परंतु यात अज्ञात चोरट्यांनी दुचाकी वाहन रस्त्यावर सोडून अंधाराचा फायदा घेत पळून जाण्यात यशस्वी ठरले.

कर्जत शहरात नुकतेच एका रात्रीत तीन दुकाने फोडली असल्याची घटना घडली आहे.

# डिंभे-माणिकडोह जोड बोगद्याच्या मंजुरीनंतर सत्काराची लगीनघाई.....

## आणि आता त्याच कामास राज्य मंत्रिमंडळाची स्थगिती

डॉ अफरोजखान पठाण । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कुकडी प्रकल्पाच्या डिंभे-माणिकडोह या जोड बोगद्याच्या कामास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली असून मागील आठवड्यात याच प्रकल्प मंजुरीनंतर अनेक लोकप्रतिनिधींनी आपली पाठ थोपटून घेत घाई-गडबडीत सत्कार सोहळे देखील पार पाडले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दिलीप वळसे पाटील यांनी या जोड बोगद्याच्या प्रस्ताव मंजुरीस विरोध केला होता. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास आपण आ. राहणार नाही असे मुख्यमंत्री फडणवीस यांना ठणकावून सांगितले होते.

राज्याचे जलसंपदा मंत्री आणि नगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मागील आठवड्यातच कुकडी प्रकल्पाच्या डिंभे-माणिकडोह या अनेक वर्षांपासून असलेल्या मागणीस चौथी सुप्रमा मान्यता घेत कामासाठी तब्बल ५ हजार ७०४ कोटी आणि ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध केला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत यास मान्यता मिळताच लाभक्षेत्रातील सर्वच लोकप्रतिनिधीनी आपल्या पाठपुराव्याचे फोटो आणि पत्र टाकत आपली पाठ थोपटून घेतली.

तसेच घाई-गडबडीत आपले सत्कार सोहळे देखील पार पाडले. मात्र शांतीमध्ये क्रांती करीत राष्ट्रवादी



काँग्रेसचे आ. दिलीप वळसे पाटील यांनी डिंभे-माणिकडोह या जोड बोगद्यास तीव्रतेने अंतर्गत विरोध करीत पुण्याचे हक्काचे पाणी इतर तालुक्यास प्राधान्यक्रम ठरवत दिल्यास आपण आमदारकीचा त्याग करू शकतो असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगितले. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी वळसे पाटील यांना योग्य निर्णय घेवू असे आश्वासन दिले होते.

मंगळवार (दि.८) रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदरचा मुद्दा चर्चेस आला असता दिलीप वळसे पाटलांसह मंत्री हसन मुश्रीफ आणि छगन भुजबळ यांनी कुकडी प्रकल्पाच्या डिंभे-माणिकडोह जोड बोगद्याच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव इतिवृंतात कायम न करता तो स्थगित ठेवावा असे म्हंटले.

यावर पालकमंत्री विखे पाटील यांनी विरोध दर्शविला मात्र अखेर फडणवीस यांनी तो सदरचा ठराव कायम न ठेवता स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

त्यामुळे मागील आठवड्यात डिंभे-माणिकडोह बोगद्यास मंजुरी मिळताच विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि आमदार रोहित पवार यांनी तात्काळ आपल्या सोशल मीडियावर पाठपुरावा केला असल्याचे पत्र-फोटो टाकत श्रेय आपलेच असल्याचे निदर्शनास आणले. राम शिंदेंचा कर्जत भाजपाच्यावतीने सत्कार सोहळा देखील पार पडला होता. मात्र आता त्याच बोगद्याच्या कामास स्थगिती मिळाल्याने सत्काराची लगीनघाई... आणि आता सत्ताधारी मंत्रिमंडळानी दिली स्थगिती अशी विरोधकांनी राळ उडवली आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.११ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# सर्वत्र पाऊस पडून शेतकरी आनंदी व्हावा

## बाळासाहेब थोरात यांची ईश्वराकडे प्रार्थना




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकऱ्यांच्या सोबत अहोरात्र शेतात राबून मातीला सोनं बनवणारा बैल हा त्यांच्या कष्टाचा खरा साथीदार असतो .शेतकऱ्यांचे पशुधन हे त्याचे सर्वस्व असते. पशुधनावर प्रेम करणारा शेतकरी हा सर्वांचा पोशिंदा असून त्याच्या जीवनामध्ये बैलपोळ्याचे महत्त्व मोठे असल्याचे गौरवोद्गार महाराष्ट्राचे माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे. तर पावसाने ओढ दिल्याने पिके करपून जात असल्याने सर्वत्र चांगला पाऊस पडून राज्यभरातील शेतकरी आनंदी व सुखी होऊ दे अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.

जोर्वे येथील संतसावली निवासस्थानी पारंपारिक पद्धतीने बैल पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी सौ कांचनताई थोरात, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांसह थोरात परिवारातील सदस्य व जोर्वे येथील ग्रामस्थ व थोरात परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी माजी कृषि व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्याच्या जीवनामध्ये पशुधन अत्यंत मोलाचे असते.

पुरातन काळापासून शेती कामासाठी बैलाचे मोठे योगदान राहिले आहे. शेतकऱ्यांचा मोठा जीव बैलामध्ये असून आजचा दिवस हा त्याचा सन्मान करण्याचा आहे. ग्रामीण भागामध्ये लहान थोरांमध्ये या सणाबाबत मोठा उत्साह असतो. महिला भगिनी पुरणपोळीचा नैवेद्य करून मोठ्या आनंदाने बैल व आपल्या पशुधनाची पूजा करतात. ही मोठी कृषी क्षेत्राची मोठी परंपरा राहिली आहे. बदलत्या काळानुसार या सणांमध्ये बदल जरी झाला तरी बैलपोळ्याचे महत्त्व अनन्य साधारण आहे. कृषी औद्योगिक क्रांतीच्या धोरणानंतर सध्या सर्वत्र ट्रॅक्टरच्या माध्यमातून शेती केली जात आहे.

अशा यांत्रिक युगातही शेतकऱ्यांचे पशुधनावरील प्रेम कायम आहे. आपण राज्याचे कृषिमंत्री पद सहा वर्षे सांभाळले असून शेतकऱ्यांना कायम मदतीची भूमिका घेतली. कृषिमंत्री पदाच्या माध्यमातून राज्यातील तमाम शेतकरी बांधवांची सेवा करण्याची संधी मिळाली .या संधीचा उपयोग हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी केला असून शेतकऱ्याला सरकारने मदत केली पाहिजे हा आपला कायम आग्रह राहिला आहे. याचबरोबर राज्यामध्ये सर्व भागात पाऊस नाही. त्या भागामध्ये चांगला पाऊस होऊन शेतीमध्ये समृद्धी निर्माण व्हावी व अलनिनोचे संकट टाळावे अशी प्रार्थना ही मा. कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली. तर डॉ जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, दरवर्षी मोठ्या उत्साहात पारंपारिक पद्धतीने आम्ही जोर्वे येथील संत सावली येथे पोळा उत्सव साजरा करत असतो.

आपल्या शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये शेती आणि पशुधनामुळे समृद्धी असते त्यांच्या प्रतिकृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असल्याने लोकनेते बाळासाहेब थोरात दरवर्षी आवर्जून सर्व गावकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये जोर्वे येथे हा सन साजरा करतात. यावेळी पारंपारिक पद्धतीने मोठ्या उत्साहात बैलपोळा जोरवे गावासह सर्वत्र साजरा करण्यात आला.

# महिलांनी दिली दहीहंडीला सलामी संगमनेरात आठ थरांचा विक्रम



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : दहीहंडी उत्सवात गोविंदा पथकांकडून मानवी मनोरे रचून हंडी फोडण्याचे दृश्य नेहमीच पाहायला मिळते. मात्र, संगमनेरात यंदाच्या दहीहंडी उत्सवाने महिलांच्या सन्मानाचा नवा आदर्श निर्माण केला. आ. अमोल खताळ पाटील युवा मंचच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी उत्सवाची सलामी देण्याचा पहिला मान पुणे कसबा येथील जुनी जोगेश्वरी रणरागिणी महिला गोविंदा पथकाला देण्यात आला.

त्याचबरोबर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच आठ थरांचा मानवी मनोरा उभारण्याचा विक्रमही संगमनेरात झाला. गोकुळाष्टमीचे औचित्य साधून संगमनेर बसस्थानक परिसरात झालेल्या या उत्सवात पुणे, ठाणे व जुन्नर तालुक्यातील गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. जुनी जोगेश्वरी रणरागिणी महिला गोविंदा पथकाने चार थरांचा मनोरा रचून दहीहंडीला सलामी दिली. त्यानंतर ठाणे येथील जय हनुमान गोविंदा पथकाने तब्बल आठ थरांचा मनोरा उभारून उपस्थितांची मने जिंकली. शिवजन्मभूमी ओतूर येथील शिवशंभो गोविंदा पथकाने पाच थरांचा मनोरा रचत उत्सवात रंगत आणली. महिलांना दहीहंडी फोडण्याचा मान देण्याचा आयोजकांचा मानस होता.

मात्र, पहिल्याच वर्षीची दहीहंडी आमदार अमोल खताळ यांनी फोडावी, अशी इच्छा सहभागी गोविंदा पथकांनी व्यक्त केली. त्यांचा आग्रह मान्य करत आमदार खताळ यांनी जय हनुमान गोविंदा पथकाच्या मनोऱ्यावर चढून दहीहंडी फोडली. यावेळी 'बजरंगबली की जय', 'जय सियाराम' आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा गजर, गोविंदांची थरारक कसरत आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे बसस्थानक परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.

### पुढील वर्षी आठ थरांची दहीहंडी

*संगमनेरमध्ये यापूर्वी दहीहंडी उत्सवाचे आयोजन होत नव्हते. विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने या उत्सवाची सुरुवात केली. यंदा महायुतीच्या वतीने दहीहंडी उत्सव सुरू करण्यात आला. महिलांना प्रथम मान देऊन सलामी देण्यात आली, ही संगमनेरसाठी अभिमानाची बाब आहे. पुढील वर्षी आठ थरांची दहीहंडी आयोजित करण्याचा मानस आहे, असे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.*

# नेप्तीत पाच हातभट्टी अड्ड्यांवर धडक कारवाई

## ४१० लिटर दारू नष्ट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील अवैध व्यवसायांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम सुरू केली असून, नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेप्ती गावच्या शिवारात गावठी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या पाच अड्ड्यांवर छापे टाकण्यात आले. या कारवाईत ४१० लिटर गावठी दारू आणि दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे तब्बल ६५०० लिटर कच्चे रसायन नष्ट करण्यात आले. पोलिसांनी एकूण ३ लाख ६३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी अजय चांगदेव पवार, शशिकला चांगदेव पवार, सुनील बाजीराव पवार, राजू बाजीराव पवार, दीपक बबन नागपुरे, लहानुबाई छबु पवार, भारत माणिक पवार, मंगल भारत पवार, शरद माणिक पवार, ज्योती भारत पवार आणि कमल माणिक पवार यांच्याविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी पाच जणांना पोलिसांनी अटक केली असून, सहा जण फरार आहेत. जिल्हा पोलीस प्रमुख मुमक्का सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने पाच पथके तयार करून नेप्ती शिवारातील हातभट्टी अड्ड्यांवर एकाचवेळी कारवाई केली. पोलिसांनी गावठी दारूसह दारू निर्मितीसाठी साठवून ठेवलेले कच्चे रसायन जप्त करून नष्ट केले. ही कारवाई जिल्हा पोलीस प्रमुख मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार सहायक पोलीस निरीक्षक हरीश भोळे, उपनिरीक्षक कृष्णकुमार शेजवाड यांच्यासह पोलीस अंमलदारांच्या पथकाने केली.

# महिन्याला लाख रुपयांच्या परताव्याचे आमिष

## इंजिनिअरकडून २१ लाख घेऊन लॉन्ड्रीवाला फरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शेअर बाजारातील ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवून दरमहा तब्बल एक लाख रुपयांचा परतावा देण्याचे आमिष दाखवून राहुरी फॅक्टरी येथील लॉन्ड्री व्यावसायिकाने एका इंजिनिअरकडून २१ लाख तीन हजार रुपये घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. पैसे घेतल्यानंतर संबंधित लॉन्ड्री व्यावसायिक आपल्या आई, पत्नी व मुलीसह फरार झाल्याची तक्रार राहुरी पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. अजिंक्य किरण चव्हाण (वय ३०, रा. राहुरी फॅक्टरी) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

फिर्यादीच्या माहितीनुसार, राहुरी फॅक्टरी येथील डॉ. हर्षद ललित चोरडिया हे त्यांचे मित्र असून, त्यांच्या माध्यमातून संतोष विनायक भोसले (रा. चिंचविहीरे, ता. राहुरी) यांच्याशी ओळख झाली. भोसले याचे राहुरी फॅक्टरी येथे ड्राय क्लिनिंगचे दुकान असून, तो शेअर बाजारात ट्रेडिंग करतो आणि गुंतवणुकीवर दरमहा पाच टक्के परतावा देतो, असे त्याने सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. चव्हाण यांच्या घरावर आदर्श पतसंस्थेचे सुमारे २० लाख रुपयांचे कर्ज होते. कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यांनी डॉ. चोरडिया यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर डॉक्टरांच्या घरी पुन्हा भोसले यांच्यासोबत बैठक झाली. त्यावेळी भोसले याने २० लाख रुपये शेअर बाजारातील ट्रेडिंगमध्ये आपल्या नावावर गुंतविल्यास दरमहा एक लाख रुपये मिळवून देण्याचे आश्वासन दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. भोसले याच्यावर विश्वास ठेवून चव्हाण यांनी विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतले.

त्यातून वेळोवेळी भोसले यांच्या बँक खात्यावर ऑनलाइन पद्धतीने एकूण २१ लाख तीन हजार रुपये पाठविले. मात्र, काही दिवसांनी चव्हाण हे भोसले यांच्या लॉन्ड्री दुकानात गेले असता तो तेथे आढळून आला नाही. त्याचा मोबाईलही बंद होता. घरी चौकशी केली असता भोसले हा आई, पत्नी व मुलीसह निघून गेल्याचे समजले. दरम्यान, शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या नावाखाली आणखी काही लोकांचीही अशाच प्रकारे फसवणूक केल्याची माहिती चव्हाण यांना मिळाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यांच्या तक्रारीवरून संतोष विनायक भोसले याच्याविरुद्ध राहुरी पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# पारनेरची संजय गांधी निराधार समिती जाहीर; महायुतीत पुन्हा अंतर्गत धुसफूस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : पारनेर तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीवरील अध्यक्ष व अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या अखेर जाहीर करण्यात आल्या आहेत. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शिफारशी तसेच शासनाच्या निर्देशानुसार ही समिती गठित करण्यात आली आहे. मात्र, या नियुक्त्यांमध्ये महायुतीतील शिवसेना शिंदे गटाला प्रतिनिधित्व न मिळाल्याने पारनेर तालुक्यात महायुतीतील अंतर्गत राजकीय समीकरणांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासकीय योजनेच्या लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य मंजूर करण्यासाठी संजय गांधी निराधार योजना समिती महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे या समितीवरील नियुक्त्यांना राजकीयदृष्ट्याही विशेष महत्त्व आहे.

प्रशासनाने जाहीर केलेल्या आदेशानुसार पारनेर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या अशासकीय सदस्यपदी अशोक मुक्ताजी खैरे (पोखरी), सुधामती विठ्ठल कवाद (निघोज), तुकाराम चंद्रकांत खाडे (जामगाव), पंढरीनाथ कारभारी उंडे (कर्जले हर्या), रविंद्र धोंडीबा आहेर (पळसपूर), अनिल सुदाम वाबळे (घाणेगाव), रमेश पांडुरंग गाडगे (विरोली) आणि कचरू विष्णू उबाळे (पाडळी रांजणगाव) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाशी संबंधित तसेच भाजपसमर्थक कार्यकर्त्यांना संधी मिळाल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे. विशेष म्हणजे महायुतीचा घटक पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना या समितीत स्थान मिळालेले नाही. त्यामुळे महायुतीमध्ये सर्व घटकांना समान प्रतिनिधित्व देण्याच्या भूमिकेवरून राजकीय चर्चा रंगली आहे. पारनेरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. काशिनाथ दाते यांचे राजकीय वर्चस्व असताना शिवसेना शिंदे गटाचे नेते सुजित झावरे पाटील हे देखील तालुक्यात सक्रिय आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील घटक पक्षांमधील पद वाटप आणि समित्यांवरील नियुक्त्यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. अशातच संजय गांधी निराधार समितीत शिंदे गटाला स्थान न मिळाल्याने महायुतीतील अंतर्गत नाराजी पुन्हा समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# घोडेगाव - कुकाणा परीसरात बैलपोळा अनु उत्साही वातावरणात साजरा



सोपान भगत | राष्ट्र सह्याद्री

**घोडेगाव** : बैलपोळा म्हणजे शेतकऱ्यांची बैल आणि त्याच्याप्रति आसलेली कृतज्ञता व्यक्त करणारा सण म्हणजे बैलपोळा मात्र या बळीराजाच्या सणावर दुष्काळाचे सावट असल्याने घोडेगाव कुकाणा परिसरासह तालुक्यात बैलपोळा सण अनुउत्साही वातावरणामध्ये साजरा करण्यात आला. पूर्वी शेतातील नांगरणी, पेरणीसह मशागतीची सर्व कामे बैलांनी केली जात होती. मात्र, ही कामे आता ट्रॅक्टरसह इतर यंत्रांनी केली जात असल्याने हौशी शेतकऱ्यांकडे बैलजोड्या उरल्या आहेत. बैलपोळा सणाला बैलांना मोठा मान असतो बैलांप्रति प्रेमाचा आविष्कार करणारा सण - शेतकरी वेळ आणि श्रमाची बचत करीत ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरणी, पेरणीसह मशागतीची कामे ही ट्रॅक्टर व अन्य यंत्रांद्वारे केली जाते. त्यामुळे शेतकरी बैलजोड्या सांभाळत नाहीत. परिणामी, शेतकऱ्यांच्या गोठ्यातील बैलजोड्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असली तरी अनेक शेतकऱ्यांमध्ये आपल्या सर्जा राजाचा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा गाव खेड्यांमध्ये आजही टिकून आहे. बैलपोळ्याच्या आदल्या दिवशी ओसांडून वाहणारी नदी, नाल्यांनसह कालव्याच्या पाण्यात बैल चांगले धुऊन त्यांची खांदेमळणी करण्यात आली बैलांच्या अंगावर रंगरंगोटी, झुले, फुगे अशा प्रकारे सजवून मारुती मंदिराला प्रदक्षिणा घालण्यात आल्या त्यानंतर वाजतगाजत संपूर्ण गावभर मिरवणूक काढण्यात आली.

बदलत्या काळानुसार शेतीच्या मशागतीची जागा विविध अत्याधुनिक यंत्रांनी घेतली असली तरी बैला द्वारे केलेली मशागत ही पिकांसाठी अत्यंत फलदायी असते मात्र बैलाद्वारे मशागत करण्यासाठी मजूर मिळत नसल्याने बैल जोडीची संख्या कमी झाली आहे.

**भाऊराव आगळे, शेतकरी देवगाव**

तीन महिने उलटून गेले तरी देखील पाऊस पडला नसल्याने अनेक भागांमध्ये पेरण्या झालेल्या नाहीत व ज्या भागात झाल्या आहेत त्यांच्यापुढे उभी पिके जगवण्याची चिंता निर्माण झाल्याने यावर्षी पोळ्याच्या सणाला उत्साह कमी आहे.

**एकनाथ कावरे, शेतकरी कुकाणा**

# शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून नियुक्ती

## रामदास गोल्हार यांचे शिवसैनिकांकडून उत्स्फूर्त स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील कुकाणा येथील शिवसेना नेते रामदास गोल्हार भाऊ यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या अहिल्यानगर जिल्हा प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या निवडीचे शिवसैनिकांकडून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले तर जुन्या जेष्ठ शिवसैनिकांनी त्यांच्यावर निवासस्थानी जाऊन सत्काराद्वारे शुभेच्छांचा वर्षाव केला. शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख पदावर कार्यरत असलेले शिवसेनेचे जेष्ठ नेते यांची अहिल्यानगर जिल्हा प्रमुख म्हणून निवड ही शिवसेना वरिष्ठ नेत्यांनी मुंबई येथून केली.सदरची निवड ही शिवसेनेचे मुख पत्र असलेल्या सामनातून जाहीर करण्यात आली.त्यांच्या निवडीचे तालुक्यात फटाक्यांची आतषबाजीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी नेवासा तालुका शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने जिल्हा प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल शिवसेना नेते रामदास गोल्हार यांचा कुकाणा येथे जाऊन सत्कार करण्यात आला.यावेळी शिवसेना प्रणित शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, तालुका प्रमुख मच्छिंद्र म्हस्के पाटील,माजी उपसरपंच गोरख घुले, तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण, युवा नेते नारायणभाऊ लष्करे, उपसरपंच अशोक उपळकर, शिवसैनिक राजेंद्र राऊत यांच्या वतीने त्यांचा शाल बुके देऊन सन्मान करण्यात आला. रामदास गोल्हार भाऊ हे निष्ठावंत शिवसैनिक असून शिवसेनेत अनेक बदल झाले मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे हीच मुळची शिवसेना असल्याने त्यांनी एकनिष्ठ राहून शिवसेनेशी आपले नाते कधी ही सोडले नाही, प्रत्येक शिवसैनिकांच्या पाठीवर थाप देऊन त्यांना नवी ऊर्जा प्राप्त करून देण्याचे काम गोल्हार भाऊंनी केले असल्याने त्यांच्या जिल्हाप्रमुख पदाच्या निवडीने शिवसैनिकात मोठा उत्साह असून शिवसेना आता जोमाने जिल्हयात उभी राहील असा विश्वास यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सत्कार प्रसंगी बोलतांना व्यक्त केले.

यावेळी बोलताना जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार म्हणाले की जीवनात आपण कधी ही तत्वांशी तडजोड केली नाही आणि करणार ही नाही,शिवसेनेशी एकनिष्ठ होतो व शेवटच्या श्वासापर्यंत एकनिष्ठच राहून जुन्या नव्या शिवसैनिकांना एकत्रित करून अहिल्यानगर जिल्हा हा शिवसेनामय करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी बोलताना केला. जिल्हयातील प्रत्येक गावात उबाठा शिवसेनेची स्थापना केली जाईल, शिवसैनिकांना प्रोत्साहन आणि बळ देण्याचा मी प्रयत्न करेन सर्व शिवसैनिकांनी यासाठी मला साथ द्यावी असे आवाहन यावेळी बोलताना केले. कार्यक्रम प्रसंगी हिंदू हदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

यावेळी झालेल्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक शकुर शेख, कौठा येथील छत्रपती संभाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक उद्धव सोनवणे, नितीन मानूरकर, संदीप धनवटे, सुनिल चोरबेले, विजय वाघुले यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जवळ्यात बिबट्यांचा धुमाकूळ; कुत्र्यांचा फडशा

## शेतकऱ्यांच्या दारातच रात्री बिबट्यांचा मुक्काम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : जवळा परिसरात बिबट्यांचा संचार वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जवळा, देवीभोयरे, निघोज, वडनेर-कुंड वस्ती परिसरात पाच ते सहा बिबटे असल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. दिवसा शेतात जाण्यासही शेतकरी घाबरत असून, रात्री बिबट्यांचा वावर थेट मानवी वस्त्यांमध्ये वाढला आहे. जवळा-शिरूर महामार्गालगत सालके वस्ती येथे किसन बरशिले यांच्या घराच्या परिसरात गेल्या तीन-चार दिवसांपासून बिबट्याचा वावर आहे. घराच्या अंगणात ठेवलेल्या लोखंडी खाटेखाली बिबट्या बसल्याचे दिसून आल्याने बरशिले कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अंगणात लहान मुले खेळत असल्याने कुटुंबीयांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दिवसा उसाच्या शेतात दडून बसणारे बिबटे रात्री भक्ष्याच्या शोधात मानवी वस्त्यांकडे येत आहेत. जवळा व परिसरातील माळवाडी-पठारे वस्ती तसेच निघोज परिसरात बिबट्यांनी कुत्र्यांचा फडशा पाडल्याच्या घटना घडल्या आहेत. शेळ्या, मेंढ्या आणि इतर प्राण्यांवरही बिबट्यांकडून हल्ले होत आहेत. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी देवीभोयरे येथे एक बिबट्या पकडण्यात आला असला तरी परिसरातील दहशत कायम आहे. खंडोबा पाऊतके परिसर, लंके वस्ती आणि ढवळे वस्ती येथे पिंजरे लावून वनविभागाने नागरिकांना संरक्षण द्यावे, तसेच बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

### बिबट्यांचा मानवी वस्तीत वाढता वावर

जवळा, निघोज, वडनेर-कुंड आणि देवीभोयरे परिसरात बिबट्यांचा संचार वाढला आहे. रात्रीच्या वेळी नागरिकांनी एकट्याने बाहेर पडू नये, तसेच शेतकऱ्यांनी विशेष खबरदारी घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


*।। भावपुर्ण श्रद्धांजली ।।*



सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहिल..
प्रत्येक क्षणी तुमची आठवण येत राहिल..

**कै. राजू विठ्ठल भागवत**

यांना बुधवार दि. ०२/०९/२०२६ रोजी दुपारी २.४० वा देवाज्ञा झाली

**।। दशक्रिया विधी ।।**

शुक्रवार दि. ११/०९/२०२६ रोजी सकाळी ०८.०० वा. करण्याचे योजिले आहे.
तेरावा विधी : १४/०९/२०२६ रोजी राहत्याघारी (एरंडगाव)

शोकाकुल

**जगन्नाथ भागवत** — चेअरमन
**अशोकराव धस** — व्हा.चेअरमन

सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद, सभासद एरंडगाव भागवत, एरंडगाव समसुद, लाखेफळ ग्रामस्थ. विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी एरंडगाव.

प्रवचन सेवा : ह.भ.प. हरिश्चन्द्र महाराज व्यवहारे यांचे प्रवचन होईल.

- दशक्रिया ठिकाण -
नाथ मंदिर मागे, पैठण, ता. पैठण, जि. छ. संभाजीनगर